
छात्र
# प्रबोधन

मासिक पत्रक
वर्ष २, अंक ६
सौर पौष, शके १९१५

इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी, ने ज्योतिर्जगतात

**ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे अभिनव मासिक**





देऊ, घेऊ तिळगूळ लाडू
हेवे, दावे मोडून काढू
संक्रांतीला साक्षी ठेवून
स्नेह वाढवू, प्रेम वाढवू

**• या अंकात दडलंय काय? •**


- कथा : तिळगूळ — २
- स्वाक्षरी अभिमान — ५
- संवाद कर्णबधिरांशी — ८
- वाचलेच पाहिजे असे काही 'तोत्तोचान' — १३
- मला असं वाटतंय — १६
- घड्याळांच्या दुनियेत टिल्लू — २३
- How to use a dictionary — २६
- गोवा मुक्तिसंग्राम — २८
- याव्यतिरिक्त – विज्ञान, कोडी, योगासने, कविता, मुलांचे पान, इ.


*मित्र – मैत्रिणींसह भारतीय लिपीतून स्वाक्षरी करण्याचा संकल्प करा !*

## सोलापूर येथे प्रबोधकांचा मेळावा

रविवार दि. २ जानेवारी ९४ : सायं ४.३० ते ६.०० : **कथाकथन**

सोमवार दि. १७ जानेवारी ९४

| वेळ | कोणासाठी | विषय/कार्यक्रम | सभासद सोडून इतरांसाठी शुल्क |
|---|---|---|---|
| स. १० ते १२ | १० वी | व्याख्यान : अभ्यास मार्गदर्शन परीक्षा तंत्र | ५/- |
| दु. २.०० ते ६.३० | ७ वी ते १२ वी | मेळावा : विविध स्पर्धा गटश : कार्यक्रम, गंमतजत्रा, हस्तकौशल्ये शिकणे | २/- |
| **बरोबर आणावयाचे साहित्य : कात्री, फेविकॉल, कंपासपेटी, वही, गंमतजत्रेसाठी पैसे** | | | |
| संध्या. ५. ३० ते ७.०० | पालक व शिक्षक | चर्चात्मक व्याख्यान विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला खतपाणी कसे घालणार? | - |

सर्व कार्यक्रमांसाठी स्थान : ज्ञान प्रबोधिनी, बालविकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर

***अनेक मित्रमैत्रिणींसह मेळाव्यात सहभागी व्हा!***

वरील मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी उत्साही विद्यार्थ्यांनी सकाळी ९ वाजता ज्ञान प्रबोधिनी मध्ये यावे

## सांगली येथे 'छात्र प्रबोधन'चे कार्यालय सुरू !

- **कार्यालयाचा पत्ता** : शैलेन्द्र का. केळकर
  ६९२, खाडीलकर गल्ली,
  गावभाग, सांगली.
- वेळ : मंगळ. संध्या. ५.३० ते ७
  शुक्र. सकाळी १० ते ११
  रवि. दुपारी ४ ते ६
- येथे 'छात्र प्रबोधन'चे ग्रंथालय आहे. सभासदांना १० रु. शुल्क भरून ग्रंथालयातून पुस्तके वाचनासाठी घेऊन जाता येतील.
- सांगली येथे होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती या कार्यालयातून मिळेल.
- 'छात्र प्रबोधन'च्या नवीन सभासदांची नोंदणी येथे करता येईल.
- तसेच 'छात्र प्रबोधन' च्या अंकात जाहीर केलेली प्रकाशने विक्रीसाठी येथे उपलब्ध असतील.

*सांगली प्रमाणेच इतरही जिल्ह्यांमध्ये 'छात्र प्रबोधन'ची कार्यालये सुरू करायची आहेत. अर्थातच हे काम स्वयंसेवी वृत्तीने करावयाचे आहे. इच्छुक पालक - शिक्षक - युवक - युवतींनी 'छात्र प्रबोधन'च्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा!*

# संवाद

*प्रिय प्रबोधक मित्र – मैत्रिणींनो !*

*सांगली येथील मेळाव्याने प्रबोधनच्या आपल्या गावोगावच्या मेळाव्यांना जोरदार प्रारंभ झाला. सुमारे दोनशे सभासद सांगलीतील मेळाव्यास उपस्थित होते. अन् खूप उत्साहाने सर्वांनी त्यात सहभाग घेतला. ग्रंथालयाचे उद्‌घाटनही छान झाले. येत्या दोन महिन्यांत इतरही ठिकाणी असेच जोरदार मेळावे होतील अशी आशा आहे.*

*हिवाळ्यातला गारठा चांगलाच जाणवायला लागला असेल पण या गारठ्याला अंगात शिरू देऊ नका. व्यायाम करून अंगात निर्माण झालेल्या उष्णतेने थंडीला दूर पळवून लावा. येते दोन तीन महिने व्यायामाला अन् शरीर सतेज सुदृढ करायला खूप पोषक आहेत.*

*रोजच्या जीवनात तुम्ही तुमची राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम कसे व्यक्त करता? देशातील घडामोडींचा अभ्यास करून, त्यावर विचार, चर्चा करून, शक्यतो मदतीचा हात पुढे करून, देशासमोरील प्रश्नांवर उत्तरे सापडविण्यासाठी धडपड करून, 'राष्ट्रार्थ भव्य कृती काही पराक्रमाची' करण्याचा मनोमन निश्चय करून आणि इतरही अनेक प्रकारांनी तुम्ही तुमचे राष्ट्रप्रेम व्यक्त करत असाल! (नसाल तर करायला हवे!) तुमचे राष्ट्रीयत्व प्रकट करण्यासाठी तुमची ओळखही तुम्ही या राष्ट्रातील लिपींमधून म्हणजेच भारतीय लिपींमधून केली पाहिजे असे नाही का तुम्हाला वाटत? मग या प्रजासत्ताकदिनी अनेकांसह स्वत:ची स्वाक्षरी भारतीय लिपीतून करण्याचा संकल्प करा.*

*यंदाच्या वर्षी मकरसंक्रांतही जरा वेगळ्या पद्धतीने साजरी करा. कशी ते शेवटच्या पानावर वाचा. तुम्ही आमच्याशी संवाद करावा म्हणून एक प्रश्नावली या अंकात दिली आहे त्या आधारे व स्वतंत्रपणेही तुम्ही ती लिहून पाठवाल अशी खात्री आहे.*

*मागील अंकामध्ये अनवधानाने शुद्धलेखनाच्या काही चुका राहून गेल्या होत्या. यापुढे कोणत्याही अंकातील १० पेक्षा अधिक चुका शोधून निदर्शनास आणून देणाऱ्यास आमच्या वतीने एक बक्षीस मिळेल. पाहुयात किती बारकाईने आपण मासिक वाचता ते!*

*नववर्षासाठीच्या शुभेच्छा दीपावलीच्या पाडव्याला*
*(विक्रमसंवत् तेव्हा सुरू होते) आणि चैत्राच्या*
*गुढीपाडव्याला (शक तेव्हा सुरू होते) तूर्त संक्रांतीच्या*
*निमित्ताने आपला स्नेह वाढो हीच अपेक्षा.*

**सस्नेह तुमचा**

**(महेन्द्र सेठिया)**

# तिळगूळ

– योगिनी जोगळेकर, पुणे

रावबहादूर पोतनीसांचा तो भव्य चौसोपी वाडा समोर आला तरी चिंतामणीच्या डोळ्यांपुढे कोकणातील ते चंद्रमौळी घरकूल, त्याच्या ठेंगण्या दाराला ओठंगून निरोप देणारी आई, तिची पाणावलेली नजर आणि ओढलेली काया दिसत होती. ते बहुमोल शब्द तर कानांच्या तळघरात दबा धरून बसले होते.

'मणी, मनाला लावून घेऊ नकोस, विद्येला सामोरं जाण्यासाठी प्रसंगी घराला पाठमोरं व्हावं लागतं; घराच्या सावलीत विद्येचं रोपटं वाढत नाही. जगाच्या उन्हा-पावसात ते अंग धरतं. तुम्ही विद्येला पाठ दाखवा, जग तुम्हाला पाठ दाखविल. तुम्ही विद्येच स्वागत करा, मग तुमचं स्वागत करील.'



'विद्या-विद्या' मणी स्वत:शीच पुटपुटला 'विद्या विद्यार्थी – खराखुरा विद्यार्थी म्हणून मी रावबहादूरांकडे राहणार आहे, नाही का?'

आणि तो रावबहादूरांच्या दिवाणखान्यात ओळखीच्या चिठ्ठीनिशी थडकला. समोरच्या आराम खुर्चीवर एक प्रौढ गृहस्थ बसले होते. मोठमोठ्या मिशा ते मधूनच कुरवाळीत. लाल लाल डोळे मोठाले करीत. जाड भिंगाचा चष्मा नाकावर बसवीत. माथ्यावरची शेंडी झटकीत. भली मोठ्ठी जांभई देत हातातील वृत्तपत्र भुवईत आठी घालून न्याहाळीत. मणीच्या मनात आले 'जगातील सारी उग्रता यांच्या चेहऱ्याला आसऱ्याला येऊन राहिली आहे की काय? आणि अशांच्या सावलीला आता आम्ही राहायचं म्हणजे झालंच! यांनी त्या उग्र लालसर डोळ्यांनी बागेत नजर टाकली तर पांढऱ्याशुभ्र मोगऱ्याचीसुद्धा लालभडक जास्वंद होऊन जाईल.' तरी पण त्याने धारिष्ट्य केलेच –

'आपण रावबहादूर पोतनीस?'

'मग काय गावचा महार येऊन इथं आराम करतोय का?'

हि सलामीची तोफ ऐकून मणीची छातीच दणकली.

'नाव काय तुझं?'

'आई मणी म्हणते पण खरं चिंतामणी'

'उद्याची तुला चिंता नि म्हणजे चिंतामणी नाव!'

मणी मनात उत्तरला – 'आहेच माझं नाव चिंतामणी. आज ना उद्या माझ्या आईचं मन खासच निश्चींत करीन'

पण तो उघडपणे म्हणाला –

'आमच्या गावी नववीपर्यंतच शाळा आहे. तेव्हा दहावी व अकरावी इथं पुण्याला आपल्याकडे राहून करीन म्हणतो. पडेल ते काम करीन,'

'की करशील ते काम पडेल? तुम्ही हल्लीची पोरं! गोरागोमटा चेहरा नि ठीकठाक नखरा पाहून घ्या. दरिद्री म्हणवतोस नि ही कोरी सदरा – चड्डी काय आकाशातून पडली होय?'

'ही फक्त मी बाहेर जाता येता घालतो, म्हणून चांगली राहिलीय.'

'बाहेर जाताना ही नि घरात काय कुंभमेळा साजरा करतोस वाटतं?'

मणीच्या जिभेवर उत्तर सळसळले पण आईने बजावले होते, वडील माणसांना उलटून बोलू नको. ओठांच्या तिजोरीतील शब्दांची रत्नं अकारण उधळू नको.

'नांदणूक कैकाड्याची आणि मिजास बादशहाची ! म्हणे बाहेर एक अन् घरात एक! आमचं असं आत – बाहेर काही नाही. एक खडकाला नि एक बुडख्याला!'

मणीने फक्त मान खाली घातली.

'आजपासून या घरात राहायचं पण हे बघ पायरी सोडायची नाही. माझयासमोर या दिवाणखाण्यात बसलेलं---' वाक्य पुरे होण्यापूर्वीच मणी दिवाणखान्याच्या बाहेर जाऊन उभा राहिला.

असा पहिला दिवस गेला आणि या दिवसाच्या पावलावर पाऊन टाकूनच इतर दिवस जात होते. गोष्ट शुल्लक असते पण रावबहादूरांचे शब्द जणू तिखटाचा शिपकारा पिऊन बाहेर पडत. ज्याला त्याचा फटकारा बसेल त्याला हृदयापर्यंत जळजळलेच पाहिजे.

त्या दिवशी मणी रावबहादूरांना सोवळे नेसून वाढीत होता. मणीने पोळीवर तूप वाढले तोच मिशांच्या कुंपणातून शब्दांचे शरसंधान झाले –

'अरे, केवढं थोरलं वाढलंस हे तूप? छान! तुझ्या काय बापाचं जातंय म्हणा!' मणी उमगला व पुढच्या पोळीला त्याने बेताची धार धरली पण पुन्हा रावबहादूर गरजले –'' अरे, केवडंसं वाढलं तूप? छान!' तुझ्या काय बापाचं जात होतं का?''

जेवण झाल्यावर मणीने आपले प्रगति–पुस्तक स्वाक्षरीसाठी पुढे केले. त्याच्या तुकडीत तो पहिला आला होता. ''तुकडीत पहिला नंबर आलाय माझा.'' नकळत मणी बोलून गेला.

''चष्मा लावलाय मी. चारी तुकड्यांत आला का?''

''चारी तुकड्यांत तिसरा''

''मग त्या पहिल्या नंबरची किंमत


तितकीच. या रावबहादुरांच्या अन्नावर पिंड वाढतोय तुझा. पुढच्या खेपेला चारी तुकड्यांत पहिला न आणशील तर मीठ तोडीन तुझं!'' जिव्हेच्या झारीने तिखटाचा सडा शिंपला. मणीच्या हृदयात आग आग झाली. मणीने तो दाह गिळून टाकला आणि चारी तुकड्यांत पहिला क्रमांक पटकावण्याचे ठरविले.

मणीला हळूहळू कळून चुकले की मिरच्याचेच जेथे वावर आहे, त्यातून उसाची अपेक्षाच कशी करावी?

कारण सरळ शब्दाच्या वाकडे उत्तर दिल्याशिवाय आणि धड्या गोष्टींना तडे अस्तर घातल्या-शिवाय गृहस्थ पुढे जायचाच नाही! तरी पण मणीने आपला शांतपणा सोडला नाही! कारण आईने सांगितले होते-

''विद्येचा प्रपंच करताना तिखटाचे गोड करून घ्यावे लागते. दोरखंडाचे रेशीम मानून घ्यावे लागते. काट्यांना 'फूल' म्हणून संबोधावे लागते.''

- केवळ, म्हणूनच केवळ तो सारे सहन



करी. सहनशीलतेचे कवच घालून दु:शब्दांचे वार झेलून घेई. तरी पण कधी कधी कटू शब्दांचा लत्ताप्रहार झाला की, नेत्रांचे घडे उपडे उपडे होतात. पापण्यांच्या ऐलथडी पैलथडी पाणीच पाणी होते! जिभेला तिखट लागले तर नेत्रांतन निर्झर ठिबकतो आणि हृदयाला तिखट लागल्यावर त्या झऱ्याचा सागर होऊन जातो. जिभेचे तिखट साखरेने थांबते, मनाचे तिखट साखरेने वाढते, निदान मणीची तरी अशी स्थिती झाली होती.

एक संवत्सर उलटले. वर्षांच्या कबुतरावरील दिवांची पिसे उपटीत काळाचा पारधी पुढे चाचला होता. मणीच्या मनावरील कोमलतेची पिसे उपटीत रावबहादुरांचा कारभार पुढे चालला होता.

मध्यंतरी रावबहादूर आजारी पडले. मणी समोर आला, की त्यांचा तोफखाना डागला गेलाच म्हणून समजा पण त्या बाबतीत 'तुझं माझं जमेना नि तुझ्या वाचून गमेना' असे झाले होते. आजारपणात तर त्यांना क्षणोक्षणी मणी लागे. मात्र इतर सर्व इंद्रियांची क्षीण झालेली शक्ती वाचेत येऊन बसली होती. मणी त्यांचे सकाळ संध्याकाळ अंग रगडी. मग विचारी, ''आता हलकं वाटतंय का?''

''हलकं? आता अंग जास्तच जड वाटू लागलंय. तुझं रडगणं म्हणजे जशी काही गजेंद्राचीच मुसंडी. बाबा रे, मीच मीच म्हणून सहन करतो. एखादा सुदामदेव असता तर चुरडूनच जाता !''

(पान क्र. ३२ वर पुढे चालू)

# 'स्व-तंत्र' भारतात परकीय लिपीत स्वाक्षरी का?

२६ जानेवारी – भारताचा प्रजासत्तकदिन! आपल्या सर्वांच्या दृष्टीनं अत्यंत अभिमानाचा आणि गौरवाचा दिवस – कारण 'स्वतंत्र' भारताची राज्यघटना याच दिवसापासून लागू करण्यात आली. आपण सर्वजण या दिवशी एकत्र जमतो, राष्ट्रगीत म्हणतो, राष्ट्र-ध्वजाला वंदन करतो. कशाकरिता? तर आपल्या मनातलं राष्ट्राविषयीचं प्रेम, अभिमान व्यक्त करण्याकरिता, गीत, ध्वजवंदन हे सारेच आपलं मनोगत व्यक्त करण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत.

आपण पहिलीपासून एक प्रतिज्ञा म्हणतो, 'भारत माझा देश आहे.... माझ्या देशाचा मला अभिमान आहे...' पण हा 'अभिमान' दिसतो तरी कसा? कशा-कशांतून व्यक्त होतो? तर राष्ट्रगीतातून, ध्वजप्रणामातून पण खरं तर अन्यही असे अनेक मार्ग आहेत. ज्यांतून आपण ही निष्ठा, भारतीयत्व प्रकट करू शकतो. त्यांतलाच एक म्हणजे 'स्वभाषेचा' आणि 'स्वलिपीचा' वापर! भारतीय पोशाख जसं आपलं व्यक्तिमत्व खुलवितो, तसंच स्वभाषेच्या वापरानंही आपलं 'अस्सलपण' आपण दर्शवू शकतो.

अनेक भाषा आपण शिकतो. पण बऱ्याचदा सही मात्र 'इंग्रजी' लिपीतच करतो. असं वाटतं की इंग्रजी लिपीत सही करणं काहीतरी विशेष आहे. खरं तर 'स्वाक्षरी' म्हणजे आपल्या 'दूताचं'च काम करणारी गोष्ट. आपण भारतीय, आणि आपला 'दूत' मात्र पाश्चात्य वळणाचा हे कसं जुळेल! स्वाक्षरी म्हणजे स्वत:ची ओळख दाखविण्याचे, स्वत:चे राष्ट्रीयत्व प्रकट करण्याचे एक माध्यम. मग स्वत:ची ओळख दाखविण्यासाठी परकीय लिपी वापरायची! कशासाठी ही मानसिक गुलामगिरी सोसायची. काय देवनागरी लिपीत आकर्षक डौलदार स्वाक्षऱ्या करता येत नाहीत! मग देवाने तुम्हाला बुद्धी दिली कशाला? काय इतरांची भ्रष्ट नक्कल करायला? नाही ना? मग अगदी आजपासून निश्चय करा, स्वत:ची आकर्षक स्वाक्षरी तयार ठेवा आणि २६ जानेवारीच्या मुहूर्तावर अनेक मित्र-मैत्रिणींसह हा संकल्प सगळ्यांसमोर प्रकटपणे करा!

हे अभिमान चालविण्याआधी तुम्ही काय काय कराल?

- स्वत: असा संकल्प केला आहे. अशा आशयाचे एक पत्र व त्यावर आपली स्वाक्षरी करून ते प्रबोधनच्या पत्त्यावर पाठवा.
- शाळेतील मुख्याध्यापक, वर्गशिक्षक यांना भेटून २६ जानेवारीच्या ध्वजवंदनानंतर संपूर्ण शाळेचा अथवा वर्गाचा स्वाक्षरी स्वलिपीतून करण्याचा संकल्प करा.
- देवनागरी लिपीतून स्वाक्षरी करण्याची

स्पर्धा घ्या.

- शहरातील /गावातील मान्यवर व्यक्तींच्या देवनागरी स्वाक्षऱ्या मिळवा. त्यांच्याकडून या अभियानासाठी संदेश, शुभेच्छा लिहून घ्या.
- बाहेरगावच्या मित्र–नातेवाईकांना पत्रांनी याबाबतचे आवाहन करा.

तुम्ही केलेले प्रयत्न पत्राने आम्हाला कळवा. त्यांना पुढील अंकात योग्य ती प्रसिद्धी मिळेल. सोबत एक निश्चयपत्र दिले आहे.


प्रजासत्ताकदिनी ध्वजासमोर उभे राहून सामूहिकरित्या हा संकल्प करावा.

## • 'निश्चय पत्र' •


**''स्वतंत्र भारताचा सुजाण नागरिक होण्यासाठी,
आपली नावे, भाषा, लिपी, आहारपद्धती,
वेशभूषा, सण, समारंभ, संस्कार,
शिक्षण, साहित्य, इतिहास अन् धर्म
अशा साऱ्या बाबतींतले भारतीयत्व समजावून घेण्याचा
व ते अंगीकारण्याचा मी/आम्ही प्रयत्न करीन/करू.
या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देण्यासाठी
राष्ट्रीय सौर माघ ६, शके १९१५,
म्हणजेच २६ जानेवारी, १९९४ या प्रजासत्ताकदिनी
मी/ आम्ही असा निश्चय करतो की
यापुढे आयुष्यभर मी/ आम्ही, माझी/ आमची स्वाक्षरी
देवनागरी अथवा भारतीय लिपीतूनच करीन/करू.''
जयहिंद ! भारत माता की जय!**

**

पुढे दोन श्रेष्ठ व्यक्तीचे संदेश अन् त्यांच्या स्वाक्षऱ्या दिल्या आहेत त्या तुम्हाला नक्कीच हे अभियान चालविण्यास प्रेरणा दिली.



द. मा. मिराजदार



डॉ. जयंत नारळीकर

# • सामर्थ्य मागते मी ! •

*तलवार बंदुकींचा बाजार भोवताली, हृदयात प्रेमपुष्प जपण्यास पाहते मी ।*
*सैतान होय जागा, हृदयांत माणसांच्या, देवत्व माणसांचे जपण्यास पाहते मी ।*
*गावे उजाड झाली, वस्त्या जळून गेल्या, वणव्यात सांजवात लावून पाहते मी ।*
*राज्यामध्ये यमाच्या मी सृजनगीत गाते, ॐकार या स्मशानी घुमवून पाहते मी ।*
*विश्वास भंगलेला येथे पिढ्यापिढ्यांचा, आभाळ फाटलेले सांधून पाहते मी ।*
*पदरात आज माझ्या हे मूल माणसाचे, श्रद्धा उरी तयाच्या फुलवून पाहते मी ।*
*अंती समर्थ असतो हुंकार जीवनाचा, खडकात अंकुराची हिरवाई पाहते मी ।*
*साहून घाव सारे मानव्य हे अजिंक्य, साऱ्याच संस्कृतींचा इतिहास सांगते मी ।*
*लावून धार शस्त्रा बल दाखवोत कोणी, करुणेतल्या बलाचे ऐश्वर्य पाहते मी ।*
*ते राम, ख्रिस्त, बुद्ध जन्मोत संगरी या, आईपणास साऱ्या सामर्थ्य मागते मी ।।*

**– सौ. राजलक्ष्मी देशपांडे**

---

# जोनाथनची कविता

हे वेडे पाखरू धरते आकाशाची कास ।
जोनाथन नाव याचे जाते दिगंतरास ।।ध्रु।।
सतत नवे ध्येय धरी
प्रयत्नाने ते साध्य करी
सदा असतो नवा ध्यास
हे वेडे पाखरू धरते आकाशाची कास
जोनाथन नाव याचे जाते दिगंतरास ।।१।।
वाळीत टाकले जरी जथ्याने
हरली नाही हिंमत याने
शिकणे नवीन प्रिय यास
हे वेडे पाखरू धरते आकाशाची कास
जोनाथन नाव याचे जाते दिगंतरास ।।२।।
बोध यावरूनी घेऊया
सतत पुढेच जाऊया
निश्चयाचा न होई ऱ्हास
हे वेडे पाखरू धरते आकाशाची कास जोनाथन
नाव याचे जाते दिगंतरास ।।३।।


**सुशील बेल्हेकर**
९ वी, महाराष्ट्रीय मंडळ, पुणे

# संवाद कर्णबधिरांशी

**– प्राचार्य शोभा प्रभुणे**

सहज रस्त्यावर फेरफटका मारताना माझं लक्ष एका गोष्टीनं वेधून घेतलं. दोन व्यक्ती एकमेकांकडे बघून मजेमजेदार हातवारे करीत होत्या. कुतूहलानं पुढे जाऊन बघितलं तेव्हा लक्षात आलं की त्या 'बोलत' होत्या. दोघही मूक – बधिर होते. पेहेराव अगदी सॉफिस्टिकेटेड (आधुनिक !) थोडी खोदून चौकशी केली तेव्हा कळलं की एकजण कारखान्यात सुपरवाझर होता तर दुसरा केमिकल लॅबमध्ये रिसर्च ॲसिस्टंट! आश्चर्यच वाटलं. इतकी जबाबदारीची कामं आणि काय करणार?

पण मग आठवली हेलन केलर! मुकी बहिरीच नव्हे तर अंधही असणारी आणि तरी सर्व जगाला आपल्या प्रतिभेनं दिपवणारी! तसाच सेन! जलतरण चॅपियनशिप मिळविणारा! उत्तम चित्रकार आणि आर्किटेक्ट झालेली अच्युत बर्व्यांची सुखदा! खरंच – 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता....' हेच खरे !



पण हे मूकबधिरपणा म्हणजे नेमकं काय? हे व्यंग असणाऱ्यांना कोणत्या दिव्यातून जावं लागतं? त्यातूनही उत्तम यश कसं मिळवता येतं? असे प्रश्न आपल्याला पडतात.

१) सवाहनी श्रवण दोष – ह्या प्रकारात बाह्यकर्ण/मध्यकर्ण यांमध्ये दोष असतो. उदा. – कानातील पडद्याला भोक पडणे इ. परंतु अशा प्रकारच्या श्रवणदोषात ऐकण्याची नस ही कार्यरत असते. ह्या प्रकारचे श्रवणदोष शस्त्रक्रियेने बरे होऊ शकतात.

२) संवदेनी श्रवणदोष – ह्या प्रकारात कानातील नसांची वाढ योग्यरीतीने झालेली नसते अथवा त्या योग्य रीतीने कार्य करीत नाहीत. या श्रवणदोषावर अद्याप कोणताही उपाय वैद्यकशास्त्राला सापडलेला नाही. संवदेनी श्रवणदोष असणाऱ्या व्यक्तिंना श्रवणयंत्र वापरण्याचा सल्ला दिला जातो. जन्मापासून संवदेनी श्रवणदोष असणाऱ्या मुलांची भाषावाढ इतर सर्वसाधारण मुलांप्रमाणे होत नाही. भाषा जन्मत: कोणालाच अवगत नसते. लहानपणापासून मूल आपल्या भोवती होणारे आवाज ऐकते.

ऐकलेले उच्चार परत करण्याचा प्रयत्न करते. उच्चारांची अर्थाशी सांगड घालून शब्द बोलायला लागते. जन्मापासून कर्णबधिर असणाऱ्या मुलांच्या कानावर आवाज, उच्चार, शब्द पडतच नाहीत आणि मग जे कधी ऐकले नाही ते ती मुले वाचून व्यक्त कसे करणार? परिणामी यात काहीही दोष नसताना ही मुले बोलायला शिकत नाहीत व श्रवणदोषाबरोबरच मुकेपणाचे न्यूनत्व हातांत हात घालून येते. अशा प्रकारे ती व्यक्त समाजापासून दूर जाते.

श्रवणदोष हा लहान वयात लक्षात आल्यास तो पटकन दूर करता येतो. त्या मुलांना पटकन शिकवता येते. कर्णबधिर मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्याकरिता असणाऱ्या खास शाळा असतात. ह्या शाळांतून ओष्ठ्यवाचन, भाषाविकास, श्रवणप्रशिक्षण ह्या प्रकाराने कर्णबधिर मुलांना शिक्षण दिले जाते व त्यांना समाजात वावरणे शक्य होते.

पुण्यातील शिक्षण प्रसारक मंडळीने १९५३ मध्ये बधिरांसाठी पहिली प्राथमिक शाळा विनयकुमार रामनिवास रुइया ह्या नावाने सुरू केली. सुरूवातीस रुइया ह्या नावाने सुरू केली. सुरूवातीस चौथीपर्यंतचे शिक्षण, सुतारकाम, शिवणकाम, हस्तकला असे औद्योगिक शिक्षण विद्यालयात चालू होते. त्यावेळी विद्यार्थीसंख्या ३० ते ४० होती. आता विद्यार्थीसंख्या १५० चे वर आहे. आत्तापर्यंत ६०० विद्यार्थी शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच काळाच्या गरजेनुसार विद्यालयात बुकबाईंडिंग, टेलरिंग हे शासनमान्य प्रमाणपत्रकोर्स, चित्रकलेच्या परीक्षा, बेसिक इलेक्ट्रॉनिक्स कोर्स, होमसायन्स, सुतारकाम, टायपिंग अशाप्रकारे व्यवसायशिक्षणावर भर देणारे विषय शिकवले जातात. नुकताच कॉम्प्युटर ट्रेनिंग प्रोग्रॅमही सुरू होत आहे. या शिक्षणाच्या सोयी व संस्था वाढल्यामुळे त्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांची गरज वाढू लागली. म्हणून १९७३ पासून कर्णबधिरांना शिकविण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणकेंद्र संस्थेमध्ये सुरू झाले. दरवर्षी ५० विद्यार्थी शिक्षक हा **B.Ed. (deaf)** हा एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करतात व त्यांतील बहुतांशी विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. शालान्तपरीक्षेला (१० वी एस्. एस्. सी.) प्रतिवर्षी साधारण १० विद्यार्थी बसतात. सर्वसामान्य मुलांसाठी जो अभ्यासक्रम असतो. शालांत-परीक्षेसाठी काही विषयांची सूट असते. म्हणजे ..... अभ्यास शिकवताना त्यांना दृश्य, स्पर्श इंद्रियांची माध्यमेच उपयोगात आणावी लागतात. सर्वसामान्यांप्रमाणेच आता कर्णबधिर शैक्षणिक क्षेत्रात चांगलीच प्रगती करीत आहेत. अभ्यासाव्यतिरिक्त ही मुले कलाविषयात निपुण असतात. त्यांची चित्रकला सफाईदार असते. नाट्य स्पर्धांमध्येही ही मुले भाग घेतात. व्हॉलिबॉल, क्रिकेट यांसारख्या खेळांतही जिल्हा, राज्य, राष्ट्रीय पातळीवर खेळतात.

गतवर्षीपासून ज्युडो-कराटेचे शिक्षण विद्यालयात सुरू झालेले आहे. राष्ट्रीय पातळीवर जितेंद्र राजपूत, सचिन लोहार, महेश आबनावे हे विद्यार्थी चॅम्पियनशिप मिळवून स्पर्धेसाठी जात आहेत.

परंतु जरी विद्यार्थी शिकू लागले तरी संपर्काच्या भाषेची समस्या आहेच. कर्णबधिरांसाठी खुणांची भाषा आहे असे आपल्याला वाटते पण त्या भाषेतच खूप अडचणी आहेत. आपल्याला वाटते ती एकच खुणांची भाषा (sign language) नाही. तर प्रत्येक देशाच्या फ्रेंच, जर्मन, रशियन, अमेरिकन अशा वेगवेगळ्या साइन लँग्वेजेस आहेत. १९८९ मध्ये वॉशिंग्टन येथे 'द डेफवे' ही कॉन्फरन्स झाली. त्यात जवळजवळ सर्वचजण कर्णबधिर होते. सर्वजण साईन लँग्वेजमध्ये बोलत होते. एखाद्याचे भाषण चालू असेल तर इतर देशांचे अनुवादक आपापल्या Sign language मध्ये त्याचा अनुवाद करीत होते. भारतात साईन लँग्वेज फार प्रमाणात वापरात नाही ह्याचे कारण म्हणजे भाषेची अडचण. ही लँग्वेज इंग्रजी मध्यमावर ठेवली तर, ग्रामीण भागातही बऱ्याच जणांना इंग्रजी येत नसल्यामुळे अडचण येते. भारतात इतक्या भाषा, मराठीतही इतके प्रकार, कोणत्या भाषेवर साइन्स ठरवायच्या हे अवघड आहे. त्यामुळे sing language अमलात आणता येणे अवघड जाते. आपल्याकडे लिपरीडिंग (Lip Reading) (ओठांच्या हालचाली - वरून शब्दांचा अंदाज घेण्यास शिकविणे) अधिक उपयुक्त होते.

आपल्या येथे कर्णबधिरांना बऱ्याच वेळा मतिमंद समजतात. पण कर्णबधिर व्यक्ती बुद्धीच्या बाबतीत नॉर्मल व्यक्तीपेक्षा त्यांची जिद्द किती तरी पटीने जास्त असते. नॉर्मल मुलांच्या शाळांमधूनही काही कर्णबधिर मुले शिकत आहेत. जिद्द, महत्त्वाकांक्षा अन् कार्यक्षमता यांत कर्णबधिर मुले शिकत आहेत. जिद्द, महत्त्वाकांक्षा अन् कार्यक्षमता यांत 'नॉर्मल' माणसापेक्षा तसूभरही कमी नाहीत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळवणारा मूक बधिर बॅडमिंटपनटू राजीव बग्गा आपणा सर्वांना माहीत असेलच.

अशा कर्णबधिरांना आपण आपल्या समाजात सामावून घेतले पाहिजे. त्यांना वेगळेपणा, एकटेपणा वाटू देता कामा नये. समाजाने त्यांच्याशी सहानुभूतीने अथवा दयेच्या भावनेतून न वागता सहकार्याने वागावे. आपण आपल्या शेजारील अथवा ओळखीच्या कर्णबधिर मुलांशी मैत्री करू शकतो. कर्णबधिरांची खुणाची भाषा आपण शिकायल हवी. त्याची काही कोष्टके शेजारी दिलेली आहेत. आपण आपल्या कर्णबधिर मित्रांना दूरदर्शनवरील कार्यक्रम चालू असताना त्यासबंधी सांगू शकतो. त्यालाही तुमच्या बरोबर त्याकार्यक्रमाचा आनंद लुटू द्या. चित्रपट, नाटक पाहताना त्यालाही शक्य तेवढे संवाद खाणाखुणांद्वारा समजावून सांगा. अशा प्रकारे त्या व्यक्तीतील न्यूनगंडाची भावना आपण मैत्रीने घालवू शकू.



यंदाच्या वर्षी सुट्टीच्या निमित्ताने तुमच्या शहरातील अन्य कर्णबधिरांच्या शाळेत जाऊन या. तेथील तुमच्या वयातील मित्रमैत्रिणींचे पत्ते मिळवा व त्यांच्या घरी जाऊन त्यांना भेटा. त्यांच्याशी संवाद साधायचा प्रामाणिक प्रयत्न करा. त्यांना वेडावू नका. तुमच्या खेळांमध्ये त्यांना सहभागी करून घ्या. एक दिवस तुम्हीही मुके अन् बहिरे व्हा. अन् त्यांच्यासारखाच अनुभव घेण्याचा प्रयत्न करा. सोबतच्या चिन्हांकित भाषोच्या आधारे आपल्या मित्रांशीही संवाद साधा. त्यातून गंमत येईल. आवाज प्रदूषणाला आळा बसेल.



---

## प्रेरणा – शिबिर

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील आम्ही ८वी – ९वी च्या २६ मुलींचे दिवाळीच्या सुट्टीत सासवड येथे एक शिबिर पार पडले. तंबूमधील हे शिबिर आम्हाला अनेक प्रकारच्या प्रेरणा देऊन गेले. तंबूमधील या शिबिराचा प्रारंभच मुळी स्वत:चे तंबू स्वत: उभारण्यातून झाला. तंबू अन् तंबूतील सामानाच्या सुरक्षेसाठी दिवसा अन् विशेष म्हणजे रात्रीही रक्षक म्हणून दोघी दोघी आळी पाळीने थांबत होतो. शिबिरातील दिवसाचा प्रारंभ श्रमकार्याने अथवा क्रीडा–सत्राने व्हायचा. भरपूर दमल्यावर गरमागरम न्याहारीने उत्साह वाढायचा. नंतर विविध चरित्रांचा आम्ही अभ्यास करीत होतो. शिबिराच्या शेवटच्या दिवशी प्रत्येकीला एकेका चरित्राबद्दल १० ते १५ मिनिटे बोलायचे होते. थोर व्यक्तींच्या चरित्रांतील खूप मजेशीर अन् प्रेरणादायी प्रसंग वाचून आपणही काही करू शकू असे वाटून गेले. जेवण अन् विश्रांती नंतर ज्ञान प्रबोधिनीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या आठवणींचे, अनुभवांचे कथन झाले. सरितातार्इंनी दारूबंदीविषयी सांगितलेले धाडसी अनुभव पराक्रम करण्याची प्रेरणा देऊन गेले. संगितातार्इनी प्रार्थना अन् उपासनेचा सांगितलेला सोप्या शब्दांमधला अर्थही या पार्श्वभूमीवर खोल ठसा उमटवून गेला. शिबिराचा शेवट पुरंदरावरील सहलीने झाला. खूप मजा केली. स्वत:च चुलींवर स्वयंपाकही केला. एकूणच शिबिरात धमाल आली. इतरांच्या दृष्टीने छोट्या असणाऱ्या आम्ही मुली पुढे काहीतरी मोठं करण्याची प्रेरणा अन् स्वप्न घेऊनच या शिबिरातून घरी परतलो.

**आरती कुलकर्णी, ९ वी, पुणे.**

## पत्रव्यवहार मरणोत्तर जगाचा

अजित बि. दातार
ज्ञान प्रबोधिनी, ८ वी.

श्री. सैतानेश्वर प्रसन्न

मृ.त.नरकवासी
''भूतबंगला'' क्र. १३,
सैताननगर कॉलनी,
स्मशानवाडा, पुणे ३०
३१ फेब्रुवारी इ. स. पू.

प्रिय मित्र ड्रॅक्युला,
स.न.वि.वि.

तू पाठविलेली शवपेटिका मिळाली. त्यातील सोयी पाहून तर मी थक्कच झालो. एअर कंडिशंड व सुळे ठेवण्यासाठी कप्पे केलेली ही शवपेटिका मला इथे नरकात खूपच सुख देईल ह्यात शंकाच नाही.

मला चेटकिणीकडून कळले की स्मशानाचा फारच जीव ओतून अभ्यास चालविला आहेस व रक्तही पीत नाही. अरे, मृत्यूलोकात वरिष्ठ कनिष्ठांचे रक्त पितात मग आपण आपली संस्कृती का लोप पावू द्यावी? तरी तू नियमितपणे भरपूर रक्त पीत जा.

'भूतकाळ' पेपरातल्या बातमीप्रमाणे तिकडच्या 'कवटी–कारखान्यातील' कामगारांनी ज्यादा रक्तासाठी संप केल्याचे कळते. तू त्या कारखान्याचा मालक असल्याने त्या सर्वांना घेऊन तू काश्मीर प्रदेशात ये. तेथे तुला विपुल प्रमाणात रक्त मिळेल व तू कामगारांच्या मागण्या पूर्ण करू शकशील.

इकडे नरकात मी सुखात आहे. फक्त दिवसाला शंभराच्या वर आत्मे इकडेच येत असल्याने मुंबईपेक्षा भयंकर अशी जागेची टंचाई येथे जाणवत आहे. मृत्यूलोकातून आलेल्या एका सरकारी खात्यातील वरिष्ठाने तेथील पद्धतीप्रमाणे रक्षकांना लाच दिली असल्याने आमचे छळ थांबले आहेत. जागेच्या टंचाईमुळे लवकरच माझी बदली स्वर्गात असल्याचे कळते. मी दिवाळीत यमलोकाला भेट देऊन आलो. माझ्या बरोबर रावणदादा सुद्धा आला होता. इतके रम्य ठिकाण मी आजपर्यंत पाहिले नव्हते. नाताळमध्ये तूही एकदा हे ठिकाण पाहून ये. आता हे सैतानाच्या शेपटीप्रमाणे लांबलेले पत्र येथेच संपवतो.

लहान मुंजाबाळास अनेक आशीर्वाद. सौ. हडळीणकाकूंना नमस्कार. पिशाच्च आजोबांना कोपरापासून नमस्कार!

कळावे,
तुझाच रक्तपिपासू,
मृत

ता. क. हे पत्र फक्त रात्रीच वाचावे दिवसा त्यातील अक्षरही कोणास कळणार नाही.



प्रति,

**श्रीयुत ड्रॅक्युला**
मृतनगर,
शवपेटिका क्र. १५ ह्यूस्टन,
मुख्य स्मशानगृह,
अमेरिका.



**3 & 3 can be 0, 1, 6, 9, 27, 33 .... use your imagination.**

# तोत्तोचान

– शान्ता बृद्धिसागर, सोलापूर

तोत्तोचान ही मूळ जपानी भाषेतील कादंबरी. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील. 'लोमोई' ही तशी अगदी लहानशी शाळा – सगळ्या वर्गात मिळून अवघी पन्नासच मुलं असणारी परंतु मुलांच्यावर डोळस माया करणारे त्यांच्या मूळ प्रवृत्तींना वाव देणारे आणि मुख्य म्हणजे त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवणारे मुख्याध्यापक कोबायाशी आणि दुसऱ्या शाळेतून काढून टाकलेली, इतर सर्वसामान्य मुलांच्यापेक्षा वेगळी असणारी तोत्तोचान या शाळेत आल्यापासून कशी पहिल्या क्षणापासून हळूहळू बदलत जात एक आदर्श विद्यार्थिनी – एक आदर्श नागरिक बनत जाते त्याची अगदी सोप्या भाषेतून आणि साध्यासुध्या घटानांतून सांगितली गेलेली रसाळ कथा – पुस्तकाची मूळ लेखिका श्रीमती तेत्सुको कुरोयानाशी (जपानमधील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या) यांना आधी कल्पना तरी असेल का की 'तोत्तोचान' या पुस्तकाची लाखोच्या संख्येनं विक्री होत राहील. देशोदेशीच्या भाषेत त्याची भाषांतरे होतील अशी? आणि तुम्हाला मुद्दाम सांगायचं म्हणजे चेतनाताई सरदेशमुखांनी ते मराठीत अशा सहज आणि सुबोध भाषेत आणलं आहे की कुठतरी दूर घडलेली कथा असं तुम्हाला वाटणारच नाही आणि मुलं सगळीकडची सारखीच की. स्वभाववैशिष्ट्यांत थोडाफार फरक असतो एवढंच. तसा तर मग सख्ख्या भावंडांत सुद्धा फरक असतोच की वाचताना तुम्हाला जाणवेल की, आपण सगळेच काही काही प्रसंगी थोड्याशा तोत्तोचान आणि एक गंमत सांगू का, की तोत्तोचान असतोच की. खरा प्रश्न आहे तो तिला कोबायाशीसारखे आदर्श गुरुजी भेटले तसे आपल्याला क्वचितच लाभतात याचा. अगदी सुरुवातीपासूनच कोबायाशी आपल्याला किती वेगळे दिसतात! आता एखाद्या छोट्या सात वर्षांच्या मुलीला कोणते प्रौढ मुख्याध्यापक स्वत: उठून त्यांचे स्वागत करतील? आणि पालकांनाच सतरा प्रश्न विचारण्याऐवजी त्या मुलीला एकटीलाच आपल्या खोलीत बसवून घेऊन अखंड चार तास ती जे जे तुटक असंबद्ध अनावश्यक असे सांगते आहे ते शांतपणे ऐकून घेतील? आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे 'आजपासून तू या शाळेची विद्यार्थिनी झालीस हं, असं प्रेमळ आश्वासन तिचा खांदा थोपटत देतील? बिचाऱ्या तोत्तोचानच्या आईला केवढा दिलासा वाटला असेल याची आपण कल्पना करू शकतो.

म्हणजे तोत्तोचानच्या स्वाभावात –'

वागण्यात एकदम फरक पडला असं नाही - तिच्या खोड्या - विक्षिप्तपणा चालूच असायचा परंतु मुलांना जास्तीत जास्त समजावून घेणारे, कोणत्याही प्रसंगी डोकं अतिशय शांत ठेवणारे कोबायाशी मुलांशी इतक्या प्रेमळपणाने वागायचे की एकही शब्द न बोलताही मुलांना आपली चूक उमगून यायची. आत संडासामध्ये पर्स पडली म्हणून सर्व घाण उपसणाऱ्या तोत्तोचानवर न संतापणं फक्त त्या तसल्या जगावेगळ्या मुख्याध्यापकांनाच साधो जाणे! 'तुझं सगळं काम संपल्यावर पुन्हा तू माती आत टाकून देणार आहेस होय ना?' एवढंच वाक्य ते बोलले पण त्याचा केवढा खोलवर परिणाम तोत्तोचानवर झाला! शाळेत सगळ्या मुलींना जे उपलब्ध होऊ शकत नाही, ते आपणही न वापरणं चांगलं हे किती आर्जवी भाषेत कोबायाशींनी तोत्तोचानला समजावून दिलं. खरं म्हणजे त्यांचं सगळ्याच मुलांच्याकडे बारकाईनं लक्ष असायचं. वाढ खुंटलेल्या ताकाहाशीला आपलं न्यून जाणवू नये म्हणून कोबायाशींनी किती विचारपूर्वक खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या!

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलांना तू चांगला आहेस - चांगली आहेस असं मनापासून म्हणत राहण्यानं त्यांचं संपूर्ण आयुष्यच किती बदलून जातं. एकच वाक्य पण ते वेळीच योग्य व्यक्तीकडून उच्चारलं गेलं की संबंधित व्यक्तीचं भवितव्य केवढं उजळून जातं! लहानपणी अवमानित झालेली तोत्तोचान केवळ या शब्दामुळं पुढं कशी आदर्श विद्यार्थिनी - जबाबदार नागरिक झाली ती सर्वच कथा जाणून घेताना तुम्हाला केवढी गंमत वाटेल! तोमोई विद्यालयातील आगगाडीच्या डब्यांचा वर्ग, त्यांचा आहार पोषक असावा म्हणून घेण्यात येणारी दक्षता, त्यांच्या आगळ्यावेगळ्या सहली.... हो हो पण सगळंच सांगून मी तुमचं औत्स्युक्य मालवून टाकणार नाही. त्साठी तुम्ही स्वतःच तोत्तोचान वाचायला हवं. मित्र मैत्रिणींना वाचायला सांगायला हवं, असं मला वाटतं.

**तोत्तोचान**

लेखिका - तेत्सुको कुरोयानाशी.
मराठी अनुवाद - चेतना सरदेशमुख
रानवारा प्रकाशन,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे २९
किंमत रु. ३०/-

***

गट्टी आमची 'तामोईच्या' 'तोत्तोचानशी'
मुक्त, निर्भर बागडणाऱ्या बालपणाशी
स्पर्धा, शिक्षा, भांडण सारे करू या हद्दपार
खेळ, दंगा, मैत्रीतून शिकणे आम्हा प्यार
'सर,' 'बाई' नाहीत तर ताई आणि दादा
विश्वास कध्धी तुटणार नाही हाच आहे वादा!

***



Every stone can be a stepping stone.


# फिरती नाव

**साहित्य :** कार्डशीट, कात्री, पेन्सिल, पसरट थाळी किंवा बशी, पाणी, चाकू, डिटर्जंट पावडर, तेल, कापूर.

**कृती :** खाली दिल्याप्रमाणे नावेचा आकार कार्डशीटवर काढून घ्या व काळजीपूर्वक तो आकार कापा. (आकृतीतील त्रिकोणही नीट कापा) पसरट मोठ्या थाळीमध्ये अथवा बशीमध्ये पाणी भरा व तुम्ही तयार केलेली नाव त्यावर अलगद ठेवा. जेणेकरून ती त्यावर तरंगेल. आता चाकूच्या पात्यावर टोकाला डिटर्जंटची चिमूटभर पावडर ठेवा व नावेच्या छोट्या त्रिकोणी खाचेमध्ये ती अलगत सोडा. काही सेकंदात नाव पाण्यामध्ये फिरायला लागेल.

**असे का होते?**

डिटर्जंट पावडरच्या ऐवजी कापूराची वडी वापरली तर काय होईल? तेल वापरलं तर काय होईल? नाव फिरवण्याच्या गतीवर त्याचा काही परिणाम होईल का? नाव फिरण्याची गती कशाकशावर अवलंबून असेल? कागद, आकार, त्रिकोणी खाचेचा आकार यासारखे वेगवेगळे घटक (एका वेळेला एक) बदलून काय फरक पडतो ते पाहा. पाण्याऐवजी दूध वापरले, रॉकेल वापरले नोंदवा आणि त्याची कारणे शोधा !




---

दिवाळी अंकात **'अजब नाणं'** असा प्रयोग दिला होता. त्यामागचे बरोबर कारण **किरण देवधर ८ वी न्यू, सिटी हायस्कूल, धुळे** याने लिहून पाठविलेआहे त्याचे अभिनंदन!

### नाणे **हँगरला का चिकटून राहाते?**

हँगरच्या टोकावर इंजेक्शनच्या बाटलीचे बूच बसवून त्यावर नाणे ठेवून फिरविले असता ते पडत नाही कारण तेथे केंद्रप्रसारी बल (Centrifugal force) निर्माण होते पण हे फिरवणे थांबल्यावरही ते नाणे पडत नाही कारण बुचातील पोकळीमध्ये फिरवताना दाब कमी होतो त्यामुळे बाहेरच्या अधिक दाबामुळे नाणे त्या बुचावर घट्ट चिकटून बसते.

### असे का ?

### थंडीमध्ये आपल्या तोंडातून वाफा येताना का दिसतात?

# मला असं वाटतं की...

मध्यंतरी एका घरगुती समारंभात बरेच परिचयाचे लोक भेटले. विषय निघाला 'आजकालची मुलं म्हणजे....' इ. इ. एक वृद्ध आजी अगदी ठसक्यात म्हणाल्या, 'अहो काय ती थेरं – ते केस कापणं काय, प्यांटी घालणं काय, गाड्या फिरवणं आणि कर्कश संगीत काय – आजकालची मुलं अगदी वाया चाललीयेत'. एक प्राध्यापक गंभीर चेहेऱ्यानं उद्‌गारले. – 'पण काय त्यांचं अफाट knowledge हो ! कॉम्प्युटर्स, स्कूटर्स, कॅल्क्युलेटर्स, सगळं यांना येतंच.'

हे ऐकताना वाटलं – किती वेगळी ही दोन मतं! विषय एकच. त्याने गुण–अवगुणही एकच पण बघण्याचे दृष्टिकोन मात्र वेगवेगळे. कोणत्याही गोष्टीवर आपल्याला काही म्हणायचं असलं की 'मला असं वाटतं' यावरच आपण सुरुवात करतो. 'मला हे महत्त्वाचं. हे आपलं मत कसं ठरतं? कसं तयार होतं? ह्या 'मता'मध्ये आपण काय काय मिसळतो?'

'तो ना – निव्वळ मूर्ख माणूस आहे!', 'काय विलोभनीय चित्र आहे हो!', 'किती सुरेख डोळे आहेत – अगदी फोटो काढावासा वाटतोय!' या सगळ्या मतांकडे बारकाईनं पाहिलं तर असं लक्षात येईल की यात 'ज्ञान' आहे 'भावना' आहेत आणि काहीतरी 'करण्याची' उघड वा सुप्त इच्छा आहे.

अगदी लहानपणापासून आपण आपल्या अवतीभवती असलेल्या व्यक्ती आणि घटनांविषयी आपली मतं बनवत असतो – किंबहूना ती बनत जातात. कशाकशाचा प्रभाव आपल्या दृष्टिकोनाच्या घडणीला कारणीभूत ठरत असतो?

सगळ्यांत महत्त्वाचं असतं ते आपल्या आई–वडिलांचं आपल्याशी बोलणं आणि वागणं! 'काय घाणेरड्या शिव्या देतोयस – असं बोलणं चांगलं नाही' किंवा 'हल्ली राजेश फारच आखूडपणे वागतो बरं का' अशा अगदी साध्या साध्या संवादांतून आपली मतं आकार घेत असतात. आई–वडिलांच्या प्रभावाइतकंच महत्त्वाचं म्हणजे आपले प्रत्यक्ष अनुभव. 'अनुभवाविण मान डोलवू नको रे' हे तर आपल्या आयुष्याचं सूत्रच. 'माझ्याशी तो अगदी सरळ वागतो हं' किंवा 'हॉर्लिक्स' ना – खरचं बाई माझी मुलं अगदी आवडीनं घेतात' ह्या कॉमेंट्स आपलं अनुभवसिद्ध मत व्यक्त करत असतात. ह्या व्यक्तिगत अनुभवांमध्ये आपली काही अगदी ठोकळेबाज मतंसुद्धा असतात. बायका म्हणजे नाजुकसाजुक, मारवाडी अगदी बावळट इ. इ. मतं ही पुरेशा अनुभवाआधीच आपण पक्की केलेली असतात. ही मतं एक व्यक्ती नव्हे तर एका समूहाची बनलेली असतात.

**(पान क्र. २१ वर पुढे चालू)**

# संवाद ... तुमचा ... आमच्याशी

प्रिय प्रबोधक मित्र – मैत्रिणींनो,

'छात्र प्रबोधन'चा हा या वर्षीचा सहावा अंक. आतापर्यंतच्या अंकांवरच्या अंकांवरच्या प्रतिक्रिया तुमच्यांपैकी काहीजणांनी आवर्जून पत्र लिहून कळवल्या आहेत पण ज्यांनी लिहिले नाही, अशांच्याही मनात काही ना काही प्रतिक्रिया उमटत असणार. हे अभिप्राय, सूचना, नव्या कल्पना शब्दांत कसं मांडायचं हेच बऱ्याचदा कळत नाही. तुम्हाला तुमच्या प्रतिक्रिया शब्दांत लिहायला आम्ही या प्रश्नावलीच्या रूपाने मदत करायची म्हणतो आहोत. अंक अधिकाधिक आकर्षक आणि तुमच्या आवडीचा होण्यासाठी आम्हाला तुमचे विचार जाणून घ्यायचे आहेत.

नेमक्या शब्दांत व सुवाच्च अक्षरांत लिहिलेल्या पहिल्या पाच प्रतिक्रियांना बक्षीस दिली जातील (मग घ्या पेन हातात आणि करा सुरुवात.)

नाव : ________________ सभासद क्रमांक ________

पत्ता : ________________

१. या वर्षातील पहिल्या पाच अंकांपैकी कोणता अंक तुम्हाला सर्वांत जास्त आवडला? १/२/३/४/५ कारण

________________

________________

२. या अंकातील स्वातंत्र्योत्तर इतिहासावरील लेख इतिहासाच्या पुस्तकातील धड्यांपेक्षा वेगळे वाटले का? होय / नाही. कारण ________________

________________

________________

३. 'अभ्यासातील स्वावलंबन' ही लेखमाला उपयुक्त वाटते का? होय/नाही त्यांतील कोणत्या विषयावरचा लेख सर्वांत जास्त आवडला?

४. या अंकामधील कोणती गीते तुम्ही पाठ केली आहेत?

१) ________ २) ________ ३) ________

५. या अंकामध्ये तुम्ही करून पाहाव्यात अशासाठी काही कृती दिल्या होत्या. उदा. भेटकार्डे, वैज्ञानिक प्रयोग इ. त्यांपैकी कोणत्या कृती तुम्ही करून पाहिल्या?


१)________ २)________ ३)________ ४)________

६) 'आम्हीच लिहिणार आमचे पान' यातील कोणती कथा/कविता/विनोद इ. तुम्हाला सर्वांत आवडले?

**चित्रकला – स्पर्धा**

या पानावरील चित्र पूर्ण करा व ते रंगवा. चित्राला योग्य शीर्षक देऊन ते आमच्याकडे पाठवा.

**बक्षीस –** प्रथम क्रमांक रु. २५/–
द्वितीय क्रमांक रु. १५/–
तृतीय क्रमांक रु. ११/–





सभासदाचे नाव :
सभासद क्रमांक :
शाळा :
इयत्ता :
गाव :

७. या सर्व अंकांमधील मनोरंजक असा कोणता लेख, कथा इ. तुम्हाला सर्वांत आवडला?
१) ______________ २) ______________
कारण ______________

८) प्रत्येक पानाच्या खाली कवितांच्या काही ओळी किंवा सुवचने दिलेली असतात, त्यांचा उपयोग तुम्ही कोठे करता?
१) ______________ २) ______________

९) 'असे घटते सुंदर अक्षर' या पानांचा उपयोग तुम्ही प्रत्यक्ष सरावासाठी केला का? होय/नाही.

१०) 'शरीर सुदृढ सुंदर' या मालिकेत दिलेले कोणते व्यायाम प्रकार तुम्ही नियमितपणे करून पाहता?
१) ______________ २) ______________ ३) ______________

११) या अंकातून ज्ञान प्रबोधिनी करीत असलेल्या काही उपक्रमांविषयी तुम्हाला माहिती मिळाली. यातील कोणता उपक्रम सगळ्यांत जास्त आवडला?
१) ______________ २) ______________

१२) कोणत्या लेखातून आपणही इतरांसाठी काहीतरी केले पाहिजे अशी तीव्र इच्छा मनात निर्माण झाली. १) ______________ २) ______________

१३) 'वाचलेच पाहिजे असे काही' यात सांगितलेली कोणती पुस्तके तुम्ही वाचली?
१) ______________
२) ______________

१४) छात्र प्रबोधन मधील कोणता भाग तुम्हाला अजिबात आवडत नाही.
१) ______________
२) ______________

१५) छात्र प्रबोधन मध्ये आणखी काय काय असावे असे तुम्हाला वाटते?
१) ______________
२) ______________

१६) छात्र प्रबोधनचे सभासद वाढावेत म्हणून तुम्ही काय करू शकाल?
______________
______________
______________

याव्यतिरिक्त अन्य प्रतिक्रिया असल्यास त्याही आमच्यापर्यंत पोहोचवा.

यातल्या काही टिपिकल्स कॉमेंट्स म्हणजे - 'पक्का सदाशिवपेठी' किंवा 'अस्सल वऱ्हाडी' ह्या. मनातल्या मोठ्या कप्प्यात आपण अशा प्रतिक्रियांची जपणूक करत असतो.

आपल्या मतांवर समाजाचा सुद्धा खूप प्रभाव असतो बरं का. विशेषत: सामाजिक संस्थांचा. शाळा हा यांतला एक महत्त्वाचा घटक. 'तो ना कॉन्हेंटचा आहे. असंच वागणार तो!' किंवा 'ज्ञान प्रबोधिनीला का? वा मग हुशारच असला पाहिजे' हे अभिप्राय काय दर्शवतात. शाळेनं आपल्यापुढे ठेवलेले आदर्श, बाणवलेली शिस्त, निरनिराळे उपक्रम यांतूनच तर आपले सामाजिक दृष्टिकोन बव्हंशी घडत असतात.

त्या शिवाय आपली मित्रमंडळी तर फारच जवळची. कट्ट्यावरच्या, वर्गातल्या गप्पा, कँटीनमधले हास्यविनोद, कुजबुजल्या स्वरातलं gossip या सगळ्यांची तर आपल्या दृष्टिकोनांवर, मतांवर खूपच हुकूमत चालते. विशेषत: दोन पिढ्यांमधल्या अंतरामुळे जे बोललं जात नाही ते अशा समवयस्कांमध्ये अदी खुल्या दिलानं मांडलं जातं. अगदी व्यक्तिगत वापराच्या बुटांपासून ते सरकारच्या धोरणांपर्यंत, राष्ट्रीय प्रश्नांबाबत काहीही. 'मंडल आयोग म्हणजे निव्वळ बंडल !' इथपासून ते 'बेल जॉन्सन कसला great ना!' इक्पर्यंत सगळं चर्चित जात असतं.

पण या सगळ्यावरही मोठा प्रभाव असतो स्थानिक परंपरांचा, संस्कृतीचा, समाज - प्रामाण्याचा. विशेषत: आचार विचार, कृती हे सारं या चौकटीतच तर बंदिस्त असतं आणि म्हणमूनच आपली त्या बद्दलची मतंही तशीच कमी अधिक साच्यातलीच बनतात.

आता रस्त्यावरून जाताना एखाद्या अनोळखी मुलानं एखाद्या सुंदर मुलीला मोठ्या 'हाय, काय छान दिसतेस!' असं म्हटलं तर काय असभ्य माणूस आहे!' चप्पल काढली पाहिजे' हे तिच्या मनात येणारचं पण हेच युरोप अमेरिकेत 'ओ थँक्स अ लॉट!' नं सन्मानलं जाईल. हा आपल्या परंपरेचा मतांवरचा प्रभाव नाही का?


आधुनिक युगातलं आणखी एक महत्त्वाचं माध्यम म्हणजे प्रासारसाधनं. वृत्तपत्रं, मासिकं, रेडिओ, टीव्ही, चित्रपट हे सारं कळत नकळत आपल्या मतांवर, आपल्या विचारसरणीवर अधिराज्यच गाजवत असतात. 'Times मध्ये आलयं म्हणजे खरंच असणार ते!' तू परवाचं नाटक पाहिलंस का? तरुणांच्या प्रश्नांची किती प्रभावीपणे मांडणी केली नाही?' 'अमिताभचा नवा पिक्चर पाह्यलास? सालं असं ठोकून काढल्याशिवाय कोण सुधारत नाही बघ!' अशा प्रतिक्रिया म्हणजे या प्रसार-माध्यमांनी घडवलेली मतं.

हे सगळं इतकं सहज घडत असतं की ते आपण जाणीवपूर्वक कधीच पाहात नाही. त्यामुळे बऱ्याचदा आपले दृष्टिकोन अगदी टोकाचे बनले तरी आपण खोट्या अहंकारापोटी ते घट्ट पकडून ठेवतो. इतरही काही दृष्टिकोन असू शकतील हे आपण मान्यच करीत नाही आणि मग व्यक्ती म्हणून आपला विकास आपणच खुंटवतो. आपल्या विचारांची दारं स्वत:च बंद करतो. एक केंद्रिय वर्तुळ जसं परिघानं वाढू शकतं असं न होता आपण न वाढणारा एक बंदिस्त कोन बनतो आणि आपल्या स्वाभावाचे कंगोरे अधिकाधिक तीक्ष्ण करत राहतो पण याला उत्तर काय? मतं बदलावीत का? ती कशी बदलतात? मत बदलणं म्हणजे आपला अप्रत्यक्ष पराभव नाही? या सगळ्याबद्दल वाचूया याच्याच पुढच्या भागात - 'आता मला असं वाटत की....'

***

# शब्दकोडी

नवीन गुजर,
८ वी, अभिनव विद्यालय, पुणे




## लाडू

**आडवे शब्द :**
**१.** प्रचंड खप
**५.** मधमाशांचे आवडते खाद्य.
**७.** खग पक्षी. ९. फळावरचे आवरण.
**१०.** उद्याची उद्या. **११.** कस असलेली
**१३.** प्रभात.


**उभे शब्द :**
**२.** शंकराचे प्रिय वाद्य. **३.** वास.
**४.** 'सुगरणींचे घरटे' बहिणाबाईच्या शब्दांत
**६.** एक प्राचीन शस्त्र. **८.** चिंगु, कंजुष **९.** सूप.
**१०.** परकीय. **१२.** सेवक.

---

## आकाशकंदील

**आडवे शब्द :**
**१.** जास्तीत जास्त. **२.** तोष. **४.** धान्य पुरवठा. **६.** गती, वेग.
**७.** मोठी भेट. ९.--- हे पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणानुसार बदलते.
**१०.** माकड. **११.** पोरका, निराधार

**उभे शब्द :**
**२.** पृथ्वीची द. ध्रुव व उ. ध्रुव यांना जोडणारी रेषा.
**३.** काश्मिर हे भारताचे ---- आहे.
**४.** जनता. **५.** गृह. **८.** दीर्घकाळ वाजत राहाणारी खुणेची घंटा
**१२.** स्वार्थी, स्वार्थ साधणारा. **१३.** लोकांसाठी केलेले काम.
**१४.** जेवल्यानंतर शंभर पावले चालण्याचा रिवाज.




---

नवीन गुजर याने प्रकारे चकली, शंकरपाळी, करंजी, भुईनळा, लवंगी माळ, चांदणी, पणती असं दिवाळीचं फराळाचं भरगच्च ताट आपल्याला पाठवलं आहे.

त्याचप्रमाणे अभिजित जगताप-पवदरे, रूपाली टाके-परभणी, संध्या बुगे-अहमदनगर, प्रवीण बनकर-सोलापूर, इ. प्रबोधक मित्रांनी सुरेख शब्दकोडी पाठविली आहेत.



**Knowledge comes by steps & not by leaps.**

# घड्याळातल्या टिल्लूचे गुपित!

**– सुहासिनी देशपांडे**


त्या मोठ्या घड्याळात बसून बसून टिल्लूला भयंकर कंटाळा आला. कितीतरी वर्षं झाली टिल्लू इथं नोकरीला होता. कुठल्या तरी दूर युरोपातल्या देशात तयार झालेल्या त्या घड्याळात एक छोटं टुमदार झोपडं होतं.... घराबाहेर छोटं डवरलेलं हिरवं शेत होतं, झाडं होती, कुंपण होतं, कुंपणावर डौलदार एक कोंबडा होता. राखणीला एक कुत्रा होता, शेतात चरणारी गाय होती – पण टिल्लू बिचारा एकटा, ब्रम्हचारी – खोपटात होता नोकरीला.

टिल्लू नोकरीला लागला तेव्हा त्याला कोण आनंद झाला! खेतीवाडी, टुमदार घर, गुरंढोरं ... आणि काम काय तर हातात हातोडा घेऊन तत्पर राहायचं घड्याळाच्या लंबकाची टिक् टिक् मोजायची नि दर तासाला बाहेर येऊन टोले हाणायचे ... एक ... दोन ... तीन .... चार !

ज्या दिमाखातं टिल्लू झोपडीचं दार उघडून बाहेर येई नि टोले देऊन अंतर्धान पावे ते बघण्यासाठी माणसं नुसती गर्दी करायची! सारं म्युझियम बघायला विखुरलेली मंडळी तासांचे टोले देणाऱ्या टिल्लू शेतकऱ्याला बघायला त्या अद्भूत घड्याळापाशी जमायची. प्रेक्षकांची गर्दी बघून टिल्लूचा उर अभिमानानं भरून यायचा न् आपल्या कामाचा त्याला मोठा अभिमान वाटायचा!

पण अलीकडे टिल्लूचं काहीतरी बिनसलं होतं खास! भलतेसलते विचार त्याच्या मनात उठायचे. किती वर्षं हे असंच चालणार? छ्या:! यात काही राम नाही. घर आहे, शेत आहे, गुरढोरं आहेत, नोकरी आहे, पण टिल्लूला आताशा मुळी समाधानच वाटेना! दर तासाला आपलं तटकन् उठायचं, टोले द्यायचे न आत स्वत:ला कोंडून घ्यायचं! कुठे जाणं नाही की कुठे येणं नाही!

ही समोरची मंडळी किती सुखात आहेत.



कशी आईस्क्रीम खात फिरताहेत! दमलीयेत फिरून फिरून पण कशी टवटवलेली दिसतायेत ! कुणी आई-बाबांबरोबर आलाय, तर कुणी मित्र-मैत्रिणींबरोबर. छान नटलेली जोडपी कशी हिंडत फिरत आलीयत. आपण आपले एकटे ते एकटेच! ना कोणी बोलायला की ना कोणी हसायला! टिल्लू हिरमुसला होऊन विचार करीत असे.

अलीकडे टिल्लूला राहून राहून वाटायला लागलं - छ्य: ! निदानपक्षी एक बायको तरी हवी होती आपल्याला! इतकं छान टुमदार घर, घराभोवतीची शेतीवाडी .... कोंबडा... गाय.... एक कारभारीण असती तर काय धमाल आली असती नाही! तिनं आत स्वैपाक केला असता... मी इमाने इतबारे नोकरी केली असती. शेतात राबलो असतो. दमून

थकून आल्यावर गप्पा गोष्टी करत कारभारणीच्या हातची गरम गरम झुणका भाकर दोघांनी मिळून खाल्ली असती!

टिल्लू अशा स्वप्नात मग दंग होऊन जात असे. अशा या स्वप्नांमुळे कधी कधी मग तो टोले द्यायचा पण विसरायचा! बाहेर मग गलका सुरू व्हायचा!

''अरे, काय झालं घड्याळाला? बिघडलं वाटतं''

''अरे, तो टिंगू मनुष्य कसा नाही आला टोले द्यायला? झोपा काढतोय की काय लेकाचा!''

मग एखादा भोकाड पसरल्याचा आवाज - ''तोले देनाला भावला कुथाय?''

''अरे, बिघडलंय घड्याळ!''

''का बिगदलं?''

''बेटा, कितीतरी जुनाय ते! नवाब सालारजंगला ते भेट मिळालेलंय. बाकीची घड्याळं बघ ना! किती तऱ्हेची ....त्यांच्या आयडीया तरी बघ किती वेगळ्या ! पण हे घड्याळ म्हणजे या म्युझियमचा राजाय बरं का!''

टिल्लूच्या कानावर शब्द पडायचे. एखादेवेळी आपण काम नाही केलं तर चालणार नाही असं लक्षात येऊन तो चिडून उठायचा नि कधी धाडकन् दार ढकलून धडाधडा मन मानेल तसे टोले द्यायचा. नाहीतर एकदम स्लोऽऽऽ मोशनमध्ये स्लो ऽऽ टोले द्यायचा. जणू अंगात जीवच नाही! त्याचा मूड असेल तसं!

म्युझियमचे व्यवस्थापकांनी मग तंत्रज्ञांना बोलावलं. सारे हत्यारं घेऊन आले. त्यांनी घड्याळ खोललं. टिल्लूची तब्येत तपासली. त्याच्या स्प्रिंगा आवळल्या. एकदोन भाग बदलले. थोडे दिवस टिल्लूनं चोख काम केलं पण मग पुन्हा पहिले पाढे पंचावन्न!

एकदा गंमतच झाली. टिल्लू टोले द्यायला झोपडीबाहेर आला तो तसाच थबकला. पुन्हा स्वप्नात हरवून गेला. उदासपणे शेतीवाडीकडे एकटक् बघत बसला. हातात हातोडा तसाच ठेवून तोच आत एक गांधीलमाशी शिरली. गूंऽऽ गूंऽऽ करीत! टिल्लू पट्कन दार लोटून आत आला.

बघतो तो काय? माशी कुठली ती तर होती पंख असलेली इवलीशी परीराणी!

‘‘कोण गं तू? इथं कशाला आलीस?’’

‘‘मी परीराणी. तुला कंटाळा आला नं म्हणून आले. तुझी अवस्था बघवेना. मुलं तुला बघायला येतात त्यांना तू नाराज करतोस बरं नाही वाटत!’’

‘‘रोज राहशील इथ?’’

‘‘हो किती छान आहे तुझं घर!’’

‘‘लग्न करशील माझ्याशी? माझी कारभारीण होशील?’’ टिल्लू लाजत म्हणाला.

परीनं मग शेतकरणीचं रूप घेतलं. टिल्लू एवढीच अंगठ्याएवढी त्याची कारभारीण होऊन उभी राहिली.

‘‘हे बघ टिल्लू ...आता नीट काम करायचं. मी तुझ्यासाठी भाकरी बनवीन, लसणीचा ठेचा करीन तुझ्याजवळ बसून तुला जेवायला वाढीन.’’

‘‘खरंच? खरंच म्हणतेस तू ? तू माझी कारभारीण, मी तुझा कारभारी. आज माझ्या घराला घरपण आलं. आता मला कधी सुद्धा कंटाळा येणार नाही.’’ टिल्लू आनंदला.

हो . पण एक अट. अधून मधून मी पंख लावून बाहेर भटकून येणार. पिलांसाठी माझ्या खाऊ घेऊन येणार...

आहे कबूल?’’ परीनं विचारलं.

‘‘कबूल कबूल! एकदम कबूल!’’

टिल्लू खुषीत येत म्हणाला.

आता खरेच टिल्लू खुषीत असतो. तासातासानं टोले देतो. तेवढ्यात शेतीची गुरांची देखभाल करतो - दार बंद करून कारभारणीशी गप्पा गोष्टी करतो. कारभारीणही त्याची काळजी घेते. त्याला छान छान जेवायला घालते. मधूनच पंख लावून बाहेर फिरून येते.

तिथल्या तंत्रज्ञांना - यंत्रज्ञांना मात्र एक कोडं उलगडलेलं नाही. ‘आपण इतकं कौशल्य पणाला लावलं पण घड्याळ काही दुरुस्त झालं नाही. या ठेंगू शेतकऱ्यानं तासातासाला नीट टोले द्यावेत यासाठी जंग जंग पछाडले पण बेटा दाद देत नव्हता. अन् अचानक आपोआप ही दुरुस्ती झाली तरी कशी? काय चमत्कार?’

- अशावेळी टिल्लू कारभारणीकडे बघून डोळे मिचकावतो नि हळूच म्हणतो, ‘‘कारभारणी, सांगायचं का याचं गुपित या लोकांना?’’

**

**शब्दांचं मूळ**

‘मूषकवाहन :’ म्हणजे काय?

एवढा मोठा गणपती आणि एवढ्याशा उंदरावर स्वार! असे हे व्यंगचित्र आपण पूजेला कसे घेतले? कारण मूषकवाहन म्हणजे मूषकान् वाहयति इति। मूषकांना - चोरांना, पकडून घेऊन येतो तो. मूषकवाहन असा त्याचा मूळ अर्थ होता. आपण अगाध भाषाअज्ञानामुळे गणरायाला चक्क उंदरावर बसविले!

# How to use a Dictionary ?

**Mrs. Vaishali Naik**

Before knowing about how to use a dictionary. Let us First find out what a dictionary actually means. The difination given in encyclopedia Britanica is as follows.

A book Listing words of a language. with their meaning in the same or another language. usually in alphabetical order. often with data regarding pronunciation origin and usage.

In Simple words. dictionary tells us about the meaning of words and also gives us some more information about that word like its pronunciation (how to say it.) its tense form. whether it is a noun. verb. adjective etc. and in some case it also tells us about the origin of the word.

Now. what can you find in a good dictionary ?

**1) Arrangement of words :**

The words are arranged in the dictionary according. to the alphabetical order. That means if you want to see the word 'throw', yow will look under 't' alphabet under that section you will see words starting with 'th' in that you will see words with 'thr, thro' and finally you would be able to spot the word 'throw'.

**2) Key to Pronounciation :**

This tells us how to 'say throw word. The key or the symbols are given in the earlier pages of a dictionary which should be read carefully. Some sings used are Q, O, a, a, a ek. The sound is also shown by group of letters like /dh/, / zh,/gz/etc.'

When you actually see a word. you will find a lot of information given. Which can be understood easily. Let us consider an example throw (Q.r a u)v, (Threw, thrower.)Here (Q r u) tells us about pronunciation, v tells us that it is a verb, threw, thrown give us the various (past tense and past participle). Then the various meanings of 'throw' follow

If the word has more than one meaning then they are arranged ac-

cordingly to convenience or usefulness of the word is a part of any phrase such parts come after the meanings.

There are many words in English which have their origin in other language like Greck, Sanskrit, Parsian, Latin etc. In mose of the dictionaries, there is either a separate section for this, or the origin is given in front of the word.

Hope this information helps you when you pick up a dictionary next time!

**• असे घटते सुंदर अक्षर •**

दिवाळी अंक सोडून या वर्षीच्या चार अंकामध्ये हस्ताक्षर सुधारण्यासाठी १६ पाने देण्यात आली आहेत.

- हस्ताक्षरसुधारण्यासाठी तुम्ही त्याचा उपयोग करून घेतला का?
- उपयोग करून घेतला नसल्यास कारणे सांगा.
- ही सरावपद्धती उपयुक्त वाटते का?
- या पद्धतीत कोणता बदल हवा.
- याच पद्धतीने इंग्रजी लेखनाचा सराव द्यावा का?
  तो कितपत उपयोगी पडेल?

तुमचे मत पोस्टकार्डाने कळवा.

सरावासाठी आणखी पाने हवी असल्यास प्रत्येक पानाला १ रुपया याप्रमाणे मनिऑर्डर केल्यास पोष्टाने सरावपाने पाठवू.

**• खुलासा •**

‘तेव्हाचे शिक्षण आणि आत्ताचे यश’ व ‘प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास’ या लेखमालांतील पुढचे लेख काही कारणास्तव या अंकात छापू शकलो नाही त्याबद्दल क्षमस्व! या दोन्ही लेखमालांबद्दल आपल्या प्रतिक्रिया लेखकांनी मागितल्या आहेत. आपल्या प्रतिक्रियांवर पुढील लेखन अवलंबून असल्याने अधिकाधिक जणांनी प्रतिक्रिया पाठवाव्यात.

– संपादक


# गोवा मुक्ती संग्राम

– अनघा कुकडे – लवळेकर

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळालं खरं पण भारताचा एक अविभाज्य हिस्सा – सागरकिनाऱ्यानं नटलेला – पारतंत्र्यातच पिचत होता – गोमंतक जवळजवळ चारशे–साडेचारशे वर्षे गोवा परतंत्र होता. भारताच्या स्वातंत्र्यसूर्याचं दर्शन झालं.

दक्षिण भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरचा निसर्गसौंदर्यानं सर्वांना मोहविणारा हा एक भूभाग! उत्तरेत तेरेखोल नदी, दक्षिणेत कारवार जिल्हा (कर्नाटक) आणि पूर्वेला सह्याद्रीची विशाल छाती लाभलेला !

गोव्याचा प्राचीन इतिहास तसा फारसा ज्ञात नाही. म्हणूनच अनेक सुरस, रोमांचक दंतकथांनी सजलेला आहे पण इसवीसनानंतरचा इतिहास मात्र अनेक पुरावे, अवशेषांनी जिवंत केला आहे.



इसवीसनपूर्वकाळात अनेक छोटी छोटी राज्यं भारतात होती. दक्षिणेत प्रामुख्यानं मौर्य, सातवाहन, शिलाहार, कदंब आणि यादव राजवंशांनी शेकडो वर्षे सत्ता गाजविली. गोव्यात १२७२ पर्यंत कदंब राजांची सत्ता होती. याच काळात गोव्याचा भाग्योदय व्हायला सुरुवात झाली.

तेराव्या शतकात मुस्लिम आक्रमकांचे हल्ले सुरू झाले. मंदिरे, नगरे, इतकचं काय विश्वविद्यालयेही त्यांच्या विध्वंसक हल्ल्यांतून सुटली नाहीत. १२९४ मध्ये अल्लादद्दिन खिलजीच्या पाशवी आक्रमणानंतर गोमंतक मुस्लिम राजवटीखाली १३३६ मध्ये दक्षिणेत उभारलेल्या विजयनगराच्या वैभवशाली राज्याचा एक भाग झाला. एक उत्तम बंदरपट्टी म्हणून विकास झाला. नंतर आदिलशहाने तो जिंकून घेतला.

७ मे १४९८ – गोव्याच्या इतिहासाला झालेलं दुर्भाग्याचं दर्शन. पोर्तुगीज दर्यावर्दी वास्को–द–गामानं भारतावर पाऊल ठेवलं. इथल्या वैभवाचा सुगंध त्यानं पाश्चिमात्य

जगात नेला. तेव्हापासून सुरू झाली एक तृष्णा, जी शमविण्याकरीता सारे युरोपीय देश या सुवर्णभूमीवर तुटून पडले. पोर्तुगीजांचं सागरी सामर्थ्य जबरदस्त असल्यामुळे गोव्यावर त्यांचा अम्मल सुरू झाला. मुघलांशी युद्धात ते विजयी झाल्याने इथल्या हिंदु प्रजेनं सुरुवातीला त्यांचं स्वागत केलं खरं पण या 'गोऱ्यांच्या' 'काळ्या' कृत्यांचा अंदाज त्यांना अद्याप यायचा होता. पोर्तुगीजांनी नगरपालिका, न्यायालय इ. शासनयंत्रणा सुरू केल्या. लोकांना ते आदर्शच वाटलं. पण त्याचबरोबर त्यांनी अतिप्राचीन असं सप्तकोटीश्वराचं मंदिर पाडून त्या ठिकाणी चर्च उभारलं. इथल्या स्त्रियांशी विवाह करू लागले. पोर्तुगाल मधल्या 'दो जुबाव-३ रा' या राजाच्या धर्मांधतेमुळे गोवा हादरून निघाला. धर्मप्रसाराकरिता सेंट झेवियर आला. जबरदस्ती धर्मप्रसार होऊ लागले. हिंदू गोवा सोडून जाऊ लागले. हजारो बाटले. हजारोंना प्राण गमवावे लागले. शिवाजीमहाराज पोर्तुगीजांवर करडी नजर ठेवून होतो. त्यांच्या वचकामुळे पोर्तुगीज गोव्याबाहेर पाय पसरू शकले नाहीत. छत्रपती संभाजी महाराजांनीही त्यांच्याशी कडवा संघर्ष दिला. एकदा तर अगदी हातातोंडाशी आलेला विजय मुघलांच्या आक्रमणामुळे निसटला. पण किल्ला अगदी इर्षेला पेटून मिळविला पण गोव्याच्या मुक्तीचा मार्ग अद्याप खुला व्हायचा होता.

१० ऑक्टो. १९१० मध्ये पोर्तुगालमधली राजसत्ता नष्ट होऊन लोकशाही सुरू झाली. गोमंतकाला प्रादेशिक स्वायत्तता मिळाली. पण हे अल्पकाळाच ! १९२६ मध्ये पुन: हुकूमशाही सुरू झाली आणि गोव्यावर पोर्तुगीजांचा मन मानेल तसा कारभार सुरू झाला. तेथील नागरिकांवर पोर्तुगीज भाषा, वेष, शिक्षण, संस्कृती लादली जाऊ लागली. वृत्तपत्रांवर कडक निर्बंध आले. १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धादरम्यान गोव्यातही स्वातंत्र्याची भूक जागी झाली.

भारतातील काँग्रेस-चळवळ ऐन भरात आली होती. त्यांच्याशी संपर्क ठेवून 'गोवा - काँग्रेस-कमिटी स्थापन झाली. गोव्याची सत्य परिस्थिती जगभरच्या देशांना कळावी म्हणून पीटर अल्वारिस, मयेकर आदींनी 'गोवा लीग' ची स्थापना केली. 'डिनॅशनलायझेशन ऑफ गोअन्स' या पुस्तकात गोव्याच्या संस्कृतीवरील पोर्तुगीज आक्रमणावर टीका केली. त्यामुळे या कमिटीचे अध्यक्ष श्री. अल्मेडांना तुरुंगवास भोगावा लागला.

आता मात्र राजकीय संघर्षानं एक जोरदार रूप धारण केलं. डॉ. राममनोहर जोहियांनी गोव्यात येऊन 'कायदेभंगा'चे आवाहन केले. पंचवीस हजारांच्या समुदायाने जयजयकाराच्या ओरड्यात त्यांना समर्थन दिले. दमनचक्र सुरू झालं. अटक, लाठीमार, छळ, शिक्षा, ...... सर्व प्रकारचे मार्ग सरकारनं स्वीकारले.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात जसं अभिनव भारत, अनुशीलन समिती, हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मी इ. ना महत्त्वाचं स्थान आहे. तसंच गोव्यातही भूमिगत संघटनांना आहे. या क्रांतिकारकांपैकी कित्येक जण आग्वाद आणि लिस्बनच्या तुरुंगात आयुष्यभर पिचले. 'ज्वाला' नामक वृत्तपत्रानंही या संग्रामात महत्त्वाची भूमिका बजावली. ३० सप्टें. १९५५ मध्ये 'गोवा लिबरेशन आर्मी'ची स्थापना झाली. त्यांनी घातपातची अनेक कृत्ये केली. कितीतरी जणांनी त्यात जीवाची बाजी लावली. पोर्तुगीज पोलीस त्यांना पकडण्याचा आटोकाट प्रयत्न करीत पण त्यांचा शिवाशिवीचा खेळ संपत नसे. कारण सामान्य जनतेची सहानुभूती या 'बंडवाल्या'नाच होती.

इतकं सगळं होऊनशी भारत सरकार अजून या बाबतीत स्वस्थच होतं पण गोव्याचा लढा काही त्यामुळे अडणार नव्हता. १९५४ मध्ये 'गोवा नॅशनल काँग्रेस' च्या अधिवेशनात प्रमुख नेते पकडले गेले. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रातील युवक-संघटना पेटून उठल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शिस्तबद्ध, देशप्रेमी युवक, राष्ट्रसेवा दलाचे नेते हे सारेच या संग्रामाकरिता कटिबद्ध झाले. पुण्यात 'गोवा विमोचन सहाय्यक समिती'ची स्थापना झाली. गव्हर्नरला सत्याग्रहाची पूर्वसूचना पाठविण्यात आली. सेनापती बापट आणि नानासाहेब गोऱ्यांच्या नेतृत्वाखाली गोव्याच्या सीमेत प्रवेश करताच त्यांच्यावर लाठ्या कोसळल्या. तीन जण ठार झाले तरीही भारत सरकार काही निर्णय घेत नव्हतं.

पोर्तुगीजांच्या अमानुष अत्याचारांच्या वार्ता जशा पसरू लागल्या तसे भारतभरातून लोक सत्याग्रहाकरता येऊ लागले. एखाद्या किल्ल्याला चारही बाजूंनी वेढा घालावा तसं १५ ऑगस्ट १९५५ ला सत्याग्रहींनी गोव्यात दोडामार्ग प्रवेश केला. कॅसलरॉक आरोंदा, कणकुबी, तेरेखोल इ. ठिकाणांहून २४०८ सत्याग्रही गोव्यात घुसले. त्या सर्वांवर अंदाधुंद गोळीबार झाला. कित्येकजण ठार झाले. विश्वभर याची चर्चा झाली पण भारत सरकार अजूनही 'आंतरराष्ट्रीय नीतीमूल्या'चा सखोल अभ्यास करीत होते.

स्वातंत्र्यसंग्राम ऐन शिगेला पोहोचला. नाना मार्गांनी सरकारला 'जिणं नकोसं' करून सोडलं. त्याच वेळी पोर्तुगालच्या आफ्रिकेतील साम्राज्यासही हादरा बसला. सर्व जगात त्यांची छी:थू होऊ लागली. अमेरिका-इंग्लंड तटस्थ राहिले पण रशियानं मात्र भारताला पाठिंबा दर्शविला.

याचवेळी पोर्तुगीजांनी भारताच्या सागरी सीमेचं दोनवेळा उल्लंघन केलं. अंजदीव बेटावरून गोळ्या चालविल्या. सागरी दल सुसज्ज केलं.


शेवटी ५ डिसेंबर १९६१ ला पंडितजींनी लोकसभेत निर्णय घोषित केला आणि भारतीय लष्कर गोव्याची वाट चालू लागलं. मेजर जनरल कॅंडेथ या अभियानाचे प्रमुख होते.

'विक्रान्त, 'दिल्ली' ही लढाऊ जहाजं गोवा किनारपट्टजवळ पोहोचली. भारताची विमानं गोव्यावर घिरट्या घालू लागली. गोवा–नभोवाणी–केन्द्रावर हल्ल करून ते उद्‌ध्वस्त केलं. त्यामुळे पोर्तुगीजांच्या विखारी प्रचाराचा पायाच उखडला. 'फ्रिगेट' नामक एका पोर्तुगीज जहाजाला सागराचा तळ दाखवला.

पोर्तुगीजांना आपल्या पराभवाचा अंदाज आला होता. शेवटचा प्रयत्न म्हणून त्यांनी भारतीय सेनेच्या वाटांवर जागोजागी सुरुंग पेरून ठेवले पण त्यांच्या पाळतीवर असलेल्या भूमिगत संघटनांनी ते निकामी करून टाकले.

जशी जशी भारताची सेना पुढे सरकू लागली तसे पोर्तुगीज मागे हटू लागले. १९ डिसेंबरला गव्हर्नरने शुभ्र झेंडा दाखवून शरणागती पत्करली. चारशे वर्षांच्या गुलामगिरीवर पडदा पडला आणि गोव्यानं स्वातंत्र्यसूर्याचं मन:पूर्वक स्वागत केलं.

## शलभासन



शलभ म्हणजे टोळ. या आसनात शरीराचा आकार टोळाप्रमाणे दिसतो म्हणून याला शलभासन म्हणतात.

**स्थिती :** सतरंजीवर पालथे निजा. पाय जुळलेले आणि ताठ. तळपाय वरच्या दिशेला. हनुवटी जमिनीला टेकवा. हात वरच्या बाजूस ताठ एकमेकांना समांतर

**कृती :**

१) अंगठा आत घेऊन हातांच्या मुठी वळा नि मग हात शरीराच्या खाली जाणून ओटी पोटाखाली ठेवा. (डोळे एका बाजूला वळवून ठेवले तरी चालेल.)

२) श्वास घेऊन तो रोखा. कमरेच्या खालचा भाग हळूहळू वर उचला. पाय जुळलेले. ते गुडघ्यात वाकू देऊ नका. (प्रारंभी एकदम पूर्ण स्थिती जमणार नाही.) हिसके देत अवाजवी असह्य ताण येईल अशा पद्धतीने हे आसन करू नका. क्रमाक्रमाने काही दिवस सराव केल्यावरच ह्या आसनाची पूर्णस्थिती प्राप्त होईल. पूर्णस्थितीत काही वेळ श्वसन करीत थांबा.

३) श्वास सोडत पाय सावकाश खाली आणा नि मग 'स्थिती' मध्ये येऊन शरीर सैल ठेवून आराम करा. आरंभी एक दोन वेळाच करा. नंतर ४ ते ६ पर्यंत आवर्तने वाढवा.

**लाभ :** बद्धकोष्ठता कमी होते. मूत्रपिंडांचं कार्य सुधारतं, नितंबांचे नि कमरेचे भागाचे स्नायू कार्यक्षम होतात. पोटातील स्नायूंना त्यांचे नियोजित पचनाचे व उत्सर्गाचे काम करण्यास ताकद निर्माण होते.

(पान क्र. ४ वरून पुढे चालू)

''मग उद्यापासून बंद करू का? त्रास होत असला तर'' मणी मिस्किलपणे विचारी.

''त्रास? तुझ्यापासून इतर काय कमी त्रास पोहोचताहेत. म्हणून एवढ्यानेच तो कमी व्हायचाय? मणाचा गाडा मुठीनं थोडाच रिता व्हायचाय?''

औषध द्यायच्या वेळी मणी कुठे अभ्यासात निमग्न असला तर रावबहादूर ठणठणायचे, ''चिंत्या, गद्ध्या - औषध द्यायच्या वेळी पुस्तकात दड्या देतोस? अभ्यासात बुड्या मारतोस? आणि मी इथं काय करू? औषध द्यायला तुझ्या बापाला स्वर्गातून बोलावू? की त्याच्या हातचं प्यायला मीच स्वर्गात जाऊ?''

अगं शहारून मणी पुस्तक भिरकावी व औषध द्यायला धावे! अर्थात त्या तसल्या वक्तव्यामुळे औषध घेऊन जो कडवटपणा रावबहादुरांच्या मुद्रेवर येणार नाही तो कडवटपणा मणीच्या मुद्रेवर ठाण मांडून बसे!

तरी पण अनुभवाने ओळखून होता की, केवड्याला काटे असले तरी सुगंधही आहे! अग्नीला दाह असला तरी ऊबही आहे! म्हणूनच दहावीतून चारी तुकड्यांत पहिला क्रमांक पटकावून मणी अकरावीत गेला तेव्हा रावबहादूरांनी मणीला भारीपैकी झरणी घेऊन दिली पण ती देताना -

''मी लेखणी दिलीय तुला. आमचं वळण बिघडवू नका. नाही तर लिहाल काहीतरी चवचाल नि चवंढाळ आणि सोन्याच्या कुंभातून शेणखळा शिंपाल!'' अशी जहाल पुस्ती जोडण्याला कमी केले नाही. लवकरच मणीच्या शाळेचे स्नेहसंमेलन आले. त्याने नाटकात काम केले होते. शाळेत जाताना तो रावबहादूरांना म्हणाला,

''मला बक्षिसं मिळायची आहेत आणि मी नाटकात कामही करणार आहे. येणार ना बघायला?''

''रोज तुझ्या नाटकीपणा बघतो आहे, तो स्टेजवर आणखी वेगळा कशाला बघायला हवा?'' वक्रतेने उत्तर न येते तर ते रावबहादूर कसचे! अशोकपर्णाच्या कडांची वक्रता जेवढी स्वाभाविक असते, तेवढीच काही माणसांच्या स्वाभावातील वक्रता स्वाभाविक असते रावबहादुरांचा पिंड असाच घडला होता! अर्थात एवढं उफराटं बोलूनही प्रेक्षकांत त्यांची पगडी दिसली तेव्हा मणी सर्द झाला. घरी आल्यावर न राहवून त्याने विचारले,

''आला होतात संमेलनाला -?''
''होय!'' मिशा कुरवाळीत रावबहादूर बोलले, ''म्हटलं आम्ही नाही म्हटलं, तरी तुम्ही स्टेजवर जाऊन नंगानाच घालणार! कसलं वेडंवाकडं घाणेरडं काम

दिसलं असतं तर तिथेच स्टेजवर चढून दिली असती श्रीमुखात पण कीचक-वधातल्या भीमाची भूमिका तुला करताना पाहून 'धारिष्ट्य झालं नसेल!' मणी मनात म्हणाला व उघडपणे म्हणाला, ''भीमाची भूमिका पाहून काय वाटलं?''

''भूमिका पाहून असं ठरवलं की, त्या एवढ्या थोरल्या धिप्पाड कीचकाला धरून तू आपटलास, मग आपलं चार माणसाचं धुणं आपटणं म्हणजे तर तुझ्या हाताचा मळ !'' हेच खरे!''


एक दिवस शालेय वादविवाद मंडळातर्फे शेवटच्या तासाला जोडून महामहोपाध्याय पोतदारांचे व्याख्यान झाले. चार-दोन मुलेही बोलली. विद्यार्थी-प्रतिनिधी म्हणून मणीचे मोठे चटकदार भाषण झाले. अर्थात त्याला घरी यायला तिन्हीसांजा झाल्या. घरी येताना चांगले भाषण केल्याबद्दल अध्यक्षांकडून मिळविलेल्या शाबासकीच्या आनंदापेक्षा आता रावबहादुरांकडून कसली शाबासकी (?) मिळेल या कल्पनेच्या दु:खानेच मणीचे काळीज कातरू लागले होते. मणीच्या अभावी रावबहादुरांची संध्येची तयारी केली गेली नसल्याने ते रागारागाने ओसरीवर येरझारा घालू लागले. मिश्यांना पीळ भरू लागले. भिवया उंचावू लागले. अंगणातील मोत्यावर गुरकावू लागले आणि एकदाचा मणी आला.

त्याला आसरीच्या पायऱ्या चढू न देता ते गुरगुरले, ''चिंत्या, शाळा सुटून दोन घंटे झाले तरी कुठले उकीरडे फुंकत होतास?''

''शाळेत व्याख्यान होतं.''

''मग इथं माझी संध्येची तयारी करायला शाळेचा गडी धाडायचा होतास. राहा उभा आता असाच रात्रभर अंगणात. न विचारता उशीर केलास नाही का? मी म्हटलं की मोटारखाली चिरडलास, का टांग्याखाली भरडलास? मला नाही पण तुझ्या आईला तर तुझं सुतक कळवायला पाहिजे ना?''

मणी बोलला नाही. जीभ बोलू पाहात होती पण तेवढ्यात कुठल्याशा दूरदूरच्या खोपटाच्या दारातून शब्द उमटले, ''विद्येचे लेणे घडचताना प्रसंगी अवमानाचे देणे सोसावे लागते! विद्येचे चंदन जमवताना अभिमानाचे घर्षण सोसावे लागते!'' म्हूणनच मणीने मान खाली घातली व तो पायरीशी तसाच उभा



राहिला.

रस्त्यावरची वर्दळ आणि अंगणातील प्रकाशशलाका हळूहळू मंदावत गेली. अंधाराच्या घोंगडीत दिवस गुडूप झाला. बागेतील पाखरांचा थवा पानांच्या पांघरुणात विसावला. अष्ट-दिशांच्या चबुतऱ्यावर ताऱ्यांचे पहारे सुरू झाले. मणीला वाटले, 'आपल्या प्रमाणेच या ताऱ्यांना आकाशात यायला उशीर होतो. म्हणून रोज रात्रभरखडे राहण्याची सजा मिळते काय यांना?'

तेवढ्यात रावबहादुरांच्या खाकरण्याचा आवाज आला. ''चिंत्या चल घरात. उद्या गारठ्यात काकडून निपचित पडलास तर डॉक्टरच्या पायी माझ्याच खिशाला बूड यायची.''

''किनई, ते माझं काम होतं - मी वादविवाद - मंडळाचा चिटणीस आहे ना? मग मला कसं घरी निघून येता आलं असतं?''

''गाढवा, मघाशी हे सांगायला दातखीळ उचकता येत नव्हती? त्याबद्दल शिक्षा म्हणून पाच उठाबशा काढा नी व्हा घरात.'' या खुराकावरच मणी प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाला. एकीकडे टंकलेखन व लघुलेखनही तो शिकला होता. पतीचे वा अन्य कुणाचेही छत्र नसलेल्या आईने उतारवयात लोकांचे काबाडकष्ट उपसणे मणीला पसंत नव्हते. अर्थात त्याने हर प्रयत्न करून रावबहादुरांच्या वशिल्याने चांगलीशी नोकरी मिळवली. त्यांच्याच ओळखीने एक छोटीशी खोलीही मिळवली व तो आईला कोकणातन घेऊन आला.

रावबहादूर कसेही वागले असले, वा काहीही बोलले असले तरी विद्येविना वणवणाऱ्या मणीला त्यांनीच माणसांत आणूण बसविले होते, हे मणी विसरला नव्हता! डोंगराच्यावरून मुरुमाची भरती आली असली तरी पोटी स्नेहल जलवंती पाझरत असते. तशीच गूढ सहानुभूती त्या खडकाळ वागणुकीतून ओहळत होती हे मणी जाणून होता. वरच्या नरोटीकडे न पाहता आतल्या खोबऱ्याकडे पाहूनच श्रीफळाची जवळीक करायची नसते का?

मणीने पहिला पगार आल्याबरोबर सुवर्णाची मुद्रिका घडविली. एक जरीची धोतरजोडीही खरीदली आणि मग तो रावबहादुरांकडे गेला.

त्या जिनसा त्यांच्या पुढे ठेवून मणी सद्‌गदित वाणीने म्हणाला, ''हे फूल नाही फुलाची पाकळी क्षीरसागरातून दूध प्यायचं नी त्या दुधानं त्यालाच नैवेद्य दाखवायचा!''

''काय रे चिंत्या, ही माझी अशी सरबराई करून, माझं ऋणं एकदाचं फेडून टाकून हात झाडून मोकळं व्हायचंय वाटतं?''

''मोकळं? इतर पाशांतून मुक्त होण्यात जेवढा आनंद त्यापेक्षा मायापाशात निबद्ध होण्यात शतपट आनंद! आणि पैशाचं ऋणं फेडण्यात जेवढा आनंद त्यापेक्षा मायेचं ऋणं वाढवण्यात शतपट आनंद. मायेचं ऋण नाण्यात फेडता आलं असतं तर जीवनाची बाजारपेठ झाली असती! मायेचे दान मोहरांत घेता आलं असतं तर संसार भाडोत्री होऊन गेला असता! नाण्यांच्या चढउतारावर का कुठं नात्याची चढ-उतार अवलंबून असते? शिवाय आपण जे सोन्यासारखं शिक्षण दिलंत त्यापुढं हे सोनं म्हणजे पितळचं!''

''मी सोनयासारखं शिकवलं, ते मातीमोलाचं केलंस मूर्ख पोरा! सगळा पगार असा परद्वारी ओतून पुन: चौपदरी हाती घ्यायची आहे का?''

''पण हे परद्वार नाही. हे तर माझं हक्काचं घर - मग माझ्या पहिल्या पगारावर आपल्याइतका जगात कुणाचा बरं हक्क पोहोचतो? जो रोप राखील तोच फळ चाखील होय ना?''


पुरे झालं तुझं ते वाङ्मयात बोलणं ! मी हा असा गद्य माणूस'! चंद्राचं चांदणं बैलाच्या अंबोणात कशाला घालतोस?''

''खरंच आपल्याजवळ आज मी मूळ एक गोष्ट मागायला आलोय?''

''वाघ्याचा पाग्या झाला, तरी मूळ स्वभाव जात नाही ना तुझा? शिकवलं, पोटाला लावून दिलं - घर पाहून दिलं - अजून तुझा मागरेपणा आहेच. या रावबहादुराला पुरता लुटून घे. माझ्या खिशाला पूर्वी भोकं होती. तू आल्यापासून त्याला भगदाडं पडायला लागली. आता अजून मागणी आहेच! म्हणजे आता खिसा कापून द्यायचाच तेवढा बाकी राहिला आहे.''

''मी दुसरं काही मागत नही, मी आपल्याला काही देणार आहे त्याचा मोबदला म्हणून -''

''मग आजवर तरी हरामाचं कुठं घेतलंस? तू कपडे फाडावेत, मी मोबदला म्हणून नवे शिवावे! तू छातीच्या फासळ्या दाखवाव्या, मी मोबदला म्हणून बदामाच्या वड्या चाराव्या! तू आंतरशालेय खेळात धडपडावे, मी मोबदला म्हणून डॉक्टरचं बिल भरावं! तू शेजाऱ्यांचे पाड गोफवावे, मी मोबदला म्हणून त्यांच्यापुढं क्षमेसाठी दात विचकावे!''



‘‘पुरे ना! समुद्राच्या उड्या अन् पोरांच्या खोड्या कधी मोजता येतात का! मात्र आज जी गोष्ट मी आपल्याला देणार आहे त्याचा मोबदला आपण मला दिलाच पाहिजे, द्याल?’’

‘‘देतो, या घराचं बक्षिसपत्र मागत असलास तरी संन्यास घेऊन नंगा फकीर होऊन हिमालयात जातो. कशाचा मोबदला हवाय चिंत्या?’’

मणीने बरोबर आणलेल्या पिशवीतून घाईघाईने एक वडी काढली व ती रावबहादुरांच्या हातात ठेवीत तो म्हणाला, ‘‘आज संक्रांत ! तिळगूळ घ्या नि –’’

***

## मकरसंक्रांत

**१४ जानेवारी म्हणजे मकरसंक्रांतीचा सण ! कुडकुडणाऱ्या हिवाळ्यात अंग स्निग्ध राहावं म्हणून तीळ–गूळ खायचा; आणि द्यायचा! नेहमी आपण आपल्या मित्रमैत्रिणींना, आप्तेष्टांना तीळगूळ देतो. त्यांना ‘गोड बोला’ अशी जणू हक्काची विनंती या निमित्ताने आपण करत असतो. गेल्या वर्षभरात काही भांडण, रागवा – रागवी, रुसवे–फुगवे झाले असतील तर, कोणी अबोला धरला असेल तर, ते सर्व निघून जावं म्हणून खरं तर हा सण! सर्वांनीच अनेकांना तीळगूळ देऊन येते वर्षभर हे स्नेहाचे भावबंध अधिक घट्ट करावेत.**

**असेही अनेकजण आहेत की ज्यांच्याशी तीळगूळ देण्याच्या निमित्ताने तुम्ही मैत्री केली पाहिजे, त्यांना बोलते केले पाहिजे. त्यांच्यबद्दल आपला स्नेहभाव व्यक्त केला पाहिजे. खालीलपैकी अधिकाधिक जणांपर्यंत तिळगूळाच्या माध्यमातून पोहोचण्याचा प्रयत्न करा. तिळगूळ देतानाच त्यांच्याशी संवाद साधा. त्यांच्या मुलामुलींशी मैत्री जोडा. त्यातून तुम्ही खरा आनंद मिळवू शकाल.**

**१. आपल्या शाळेतील व घरातीलही कर्मचारी सेवक.**
**२. साफसफाई करणाऱ्यांपासून ते पोलिस अधिकाऱ्यांपर्यंत सरकारी कर्मचारी.**
**३. आपल्या गावातील सुधारगृहातील, अनाथाश्रमातील मुलेमुली.**
**४. शासकीय रुग्णायातील रुग्ण.**
**५. विविध पंथ – उपपंथांमधील व्यक्ती.**


संक्रमण नित्य होत आहे, संक्रांतीची गरज आहे, हलवा–तिळगूळ माध्यम आहे, शांति–प्रेम साध्य आहे.

# वेध यशाचा !

## १० वी अभ्यास मार्गदर्शन

इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शेवटच्या अडीच–तीन महिन्यांमध्ये अभ्यासाच्या विविध पद्धतींचा वापर करून आत्मविश्वासपूर्वक व नियोजनबद्ध अभ्यास कसा करावा ह्याचे उदाहरण–सहित विवेचन करणारे पुस्तक!

किंमत रु. ४० /– सभासदांसाठी रु. ३५/–

(मागील अंकात या पुस्तकाची किंमत रु. २५/– लिहिलेली होती तथापि प्रत्यक्ष पृष्ठसंख्या १३० पर्यंत गेल्यामुळे किमतीत बदल करावा लागत आहे. ज्यांनी आतापर्यंत २०/– रु. अथवा २५/– पाठविलेले आहेत. त्यांनी उर्वरित रक्कम लवकर पाठवावी ही विनंती.)

शाळांनी १० पेक्षा अधिक प्रतींची नोंदणी केल्यास मूळ किमतीवर २०% सवलत देता येईल.

---

## राष्ट्रीय सौर दिनदर्शिका

गेली १५ वर्षे ज्ञान प्रबोधिनी व धर्मनिर्णय मंडळ यांच्या संयुक्त प्रयत्नांमधून भरतीय सौर दिनदर्शिका प्रकाशित होत आहे. यावर्षी १ पौष शके १९१५ (२२ डिसेंबर ९३) रोजी पुढील १२ महिन्यांची ही दिनदर्शिका प्रकाशित होत आहे. स्वतंत्र भारतात भारतीय कालगणनेचा आपण आग्रह धरायला हवा. त्यासाठी जाणीवपूर्वक भारतीय सौर दिनांकांचा वापर करा. म्हणूनच सुटसुटीत व आकर्षक अशी राष्ट्रीय सौर दिनदर्शिका आपण प्रत्येकानेच जरूर विकत घ्यावी.

किंमत रु. १०/– टपाल खर्चासह रु. १२/–


छात्र प्रबोधन

हे मासिक 'ज्ञान प्रबोधिनी' या संस्थेच्या मालकीचे असून सौर १ पौष शके १९१५ (२२ डिसेंबर, १९९३) या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, गुलटेकडी येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

संपादक, प्रकाशक
श्री. महेन्द्र सेठिया

संपादक मंडळ
महेंद्र सेठिया
विवेक पोंक्षे
अनघा लवळेकर
शैलजा देशमुख

रेखाचित्रकार
श्री. दीपक संकपाळ



संपर्क
'छात्र प्रबोधन'
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०
४३२६९१



मुद्रक
प्रबोध संपदा,
पुणे – 411 002

वार्षिक वर्गणी
रु. ४०/–

नोंदणी क्रमांक
PHM/153/VIII

रजि नं. : छात्र प्रबोधन - PNCW/349 तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

## जय भारत वन्दे मातरम्!

भारत वन्दे मातरम्! जय भारत वन्दे मातरम् ।
रुक ना पाए तुफानोंमें सबके आगे बढे कदम
जीवनपुष्प चढाने निकले माताके चरणोंमें हम ।
वन्दे मातरम्।।

मस्तकपर हिमराज विराजित उन्नत माथा माता का ।
चरण धो रहा विशाल सागर देश यही सुंदरता का।
हरियाली साडी पहनी माँ गीत तुम्हारे गाए हम ।।

नदियनकी मंगल माला है पावन धारा गंगाकी
कमरबंध है विंध्याद्रीका सातपुडाके श्रेणीकी
सह्याद्रीका वज्रहस्त है, पौरुषको पहचाने हम ।।

नही किसीके आगे हमने अपना शीश झुकाया हैं
जो हमसे टकराने आया मिट्टीमें मिल पाया हैं
तेरा वैभव अमर रहे माँ, दिन हम चार रहे न रहे ।।

• संपर्क पत्ता •
संपादक, छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ,
पुणे 411 030
☏ : ४३२६९
कार्यालयाची वेळ स. १० ते १२,
संध्या. ५ ते ७
वार्षिक वर्गणी : रुपये ४०/- फक्त